CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ६ जून २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ५३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## वाकोला-बीकेसी प्रवास ५ ते १० मिनिटांत

मुंबई : वांद्रे-कुर्ला संकुलाकडे जाणाऱ्या वाहनचालकांसाठी दिलासादायक बातमी आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून प्रतीक्षेत असलेला वाकोला-बीकेसी उड्डाणपूल आता पूर्णत्वाच्या उंबरठ्यावर पोहचला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माहितीनुसार, या पुलाचे सुमारे ९८ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम पुढील १० ते १२ दिवसांत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे जूनच्या अखेरीस या पुलावरून वाहतूक सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

हा पूल सुरू झाल्यानंतर वाकोला ते बीकेसीदरम्यानचा प्रवास मोठ्या प्रमाणात सुलभ होणार आहे.

## वाहनाच्या धडकेत डॉ. तरुणीचा जागीच मृत्यू

पालघर : बोईसरच्या खैरापाडा परिसरात अवजड वाहनाच्या धडकेत डॉ. कृष्णप्रभा (वय २८) यांचा जागीच मृत्यू झाला. त्या कृष्णानगर परिसरातील रहिवासी होत्या. अपघातानंतर बोईसर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे..

## शिकारीच्या गोळीबाराचा निष्पाप बालकाला फटका

रायगड : कर्जत तालुक्यातील कुरूंग गावात शिकारीसाठी करण्यात आलेल्या कथित गोळीबारातील छरे लागून ९ वर्षीय हेमंत सराई जखमी झाला. मुलावर उल्हासनगरच्या रुग्णालयात उपचार सुरू असून नेरळ पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करून शोधमोहीम हाती घेतली आहे.

## डोकाडिया मृत्यू प्रकरणी पोलिसांसमोर चार नवे अँगल


मुंबई : दक्षिण मुंबईतील पायधुनी परिसरात राहणाऱ्या डोकाडिया कुटुंबातील चौघांच्या मृत्यू प्रकरणाचे गूढ अधिकाधिक गडद होताना दिसत आहे. कलिंगडाच्या सेवनाने चौघांचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक संशय होता. आता तर डोकाडियांच्या घरातून जप्त केलेल्या सुरी, प्लेट, भात, चिकन बिर्याणी तसेच हर्बल उंदीर नाशकात विषारी झिंक फॉस्फाईडचा अंश नसल्याचे नव्या फॉरेन्सिक चाचणी अहवालात समोर आले आहे.

## टेम्पोखाली चिरडून चौघांचा मृत्यू

कोल्हापूर : कोल्हापूरमधील होन्याली येथे एका टेम्पोने दुचाकीला धडक दिल्याने गुरुवारी मुंबईतील पवई भागात राहणारे तिशीतील जोडपे आणि त्यांची ७ व १० वर्षे वयाची दोन मुलं अशा चौघांचा मृत्यू झाला. धडकेची तीव्रता इतकी होती, की टेम्पो उलटला आणि त्याखाली बाईकस्वार चौघेही कुटुंबीय अडकले. दीपक चांदे (वय ३९), त्यांची पत्नी शोभा (वय ३५) आणि त्यांची मुले जय (वय १०) व पूर्वा (वय ७) अशी मृतांची नावे असल्याचे पोलिसांनी सांगितले

# भारत एक जागतिक महाशक्ती बनला आहे : पुतीन

वृत्तसंस्था



रशिया : रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमीर पुतिन यांनी रशियातील आतंरराष्ट्रीय आर्थिक कार्यक्रमादरम्यान, भारत आणि रशियाच्या संबंधांवर एक महत्त्वपूर्ण विधान केले आहे. यावेळी त्यांनी अमेरिकेवर निशाणा साधत; कोणत्याही देशाने भारतावर कितीही दबाव आणण्याचा प्रयत्न केला तरी, रशिया भारताला नेहमीच कच्च्या तेलाचा पुरवठा करत राहील, अशी हमी दिली आहे. तसेच लवकरच भारत आणि रशियातील करार १०० अब्ज डॉलर्सच्या टप्प्यात पोहोचेल असे आशावादी वक्तव्यही त्यांनी केले आहे. ज्यामुळे जागतिक स्तरावर भारताची मान अधिकच उंचावली असून, भविष्यात येणाऱ्या कच्च्या तेलाच्या संकटाचीही चिंता कमी झाली आहे.

सध्या भारत आणि रशियामधील व्यापार एका ऐतिहासिक उंचीवर आहे. पुतिन यांनी स्पष्ट केले की, दोन्ही देशांमधील वाढता आर्थिक समन्वय पाहता येत्या काळात हा व्यापर १०० अब्ज डॉलर्सवर पोहोचणार आहे. अमेरिकेच्या दबावानंतरही भारताने रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठवेली असून, रशिया भारताचा सर्वात विश्र्वासू ऊर्जा भागीदार बनला आहे. पाश्र्चात्य देशांचे निर्बंध भारतासारख्या महाकाय अर्थव्यवस्थेला रोखू शकत नाहीत, हेच पुतिन यांनी या आर्थिक समीकरणातून दाखवून दिले आहे.

या संवादादरम्यान पुतिन यांनी भारताची लोकसंख्या आणि महान लोकशाहीचाही उल्लेख केला. ते म्हणाले, 'भारत हा एक महान देश आणि जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे. या विकासामाने पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या केंद्र सरकारने केलेली कष्ट आहेत.' पुतिन यांच्या या विधानाचा थेट अर्थ असा आहे की, भारत आता पाश्र्चात्य देशांच्या दाबावाखाली राहणारा जुना देश राहिलेला नाही. तो स्वतःचे राष्ट्रीय हित ओळखणारा एक जागतिक महाशक्ती बनला आहे.

विशेष म्हणजे, भारताची अमेरिकेसोबतची वाढती जवळीक किंवा धोरणात्मक करारांमुळे रशिया-भारत यांच्यातील संबंधांना कोणताही धक्का बसणार नाही, असे पुतिन यांनी स्पष्ट केले आहे. तसेच 'भारत १४० कोटींपेक्षा जास्त लोकसंख्या असलेला एक स्वतंत्र सार्वभौम देशा आहे, त्यामुळे पंतप्रधान मोदींवर दबाव आणणे हे आतंरराष्ट्रीय संबंधांसाठी अत्यंत हानिकारक आहे', अशा कडक शब्दांत त्यांनी अमेरिकेला टोला लगावला आहे.

दरम्यान, २०२५ च्या डिसेंबर महिन्यात पुतिन यांच्या भारत भेटीत २०३० पर्यंत आर्थिक सहकार्य कार्यक्रम, १०० अब्ज व्यापाराचे लक्ष्य, भारतातील कुशल कामगारांना रशियात जाण्याची परवानगी, ऊर्जा क्षेत्रात आणि आर्क्टिक सी रूट, आरोग्य, अन्न सुरक्षा यासारख्या क्षेत्रात १६ पेक्षा जास्त करारांवर स्वाक्षऱ्या केल्या गेल्या. या करारांमुळे दोन्ही देशांच्या विशेष आणि विशिष्ट धोरणात्मक भागीदारीला मजबूत करण्यास अधिक मदत झाली आहे.

# प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

## गरोदर महिलांना मिळणार ११,००० रुपयांपर्यंतचा लाभ

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : केंद्र सरकारकडून गरोदर महिला आणि स्तनदा मातांच्या आरोग्यासाठी आणि पोषणासाठी 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना' राबवली जात आहे. 'मिशन शक्ती' अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या या महत्त्वाकांक्षी योजनेद्वारे आता पात्र महिलांना त्यांच्या पहिल्या आणि दुसऱ्या अपत्यासाठी ११,००० रुपयांपर्यंतचा आर्थिक लाभ दिला जात आहे.

२०१७ मध्ये पुन्हा विस्तारित स्वरूपात सुरू करण्यात आलेल्या या योजनेचा मुख्य उद्देश गरोदरपणाच्या काळात मातांना आर्थिक बळ देणे, बालमृत्यू दर कमी करणे आणि माता-बालकांचे आरोग्य सुधारणे हा आहे. ही योजना थेट लाभ हस्तांतरण द्वारे राबविली जाते, ज्यामुळे मदतीची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होते.

पहिल्या अपत्यासाठी: ५,००० रुपयांची मदत दोन टप्प्यांत दिली जाते. पहिल्या हप्त्यात ३,००० रुपये (गरोदरपणाची नोंदणी केल्यानंतर) आणि दुसऱ्या हप्त्यात २,००० रुपये (बाळाच्या जन्मानंतर) दिले जातात.दुसऱ्या अपत्यासाठी: जर दुसरे अपत्य 'मुलगी' असेल, तर सरकारकडून ६,००० रुपयांची अतिरिक्त आर्थिक मदत एकरकमी दिली जाते. एकूण लाभ: अशा प्रकारे पात्र महिलांना एकूण ११,००० रुपयांपर्यंतचे सहाय्य मिळू शकते.

१. गरोदर महिलेचे वय किमान १९ वर्षे असावे. २. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असावे. ३. मनरेगा जॉब कार्डधारक, ई-श्रम कार्डधारक, बीपीएल कार्डधारक किंवा 'पीएम किसान' योजनेचा लाभ घेणाऱ्या महिला या योजनेसाठी विशेष पात्र आहेत. ४. अर्जासाठी बाळाच्या जन्मापासून २७० दिवसांच्या आत अर्ज करणे आवश्यक आहे.

# नीट' परीक्षेच्या नियोजनाचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा

तभा वृत्तसेवा



मुंबई :गेल्या महिन्यात झालेल्या पेपरफुटीच्या गंभीर प्रकरणामुळे 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'ने (एनटीए) रद्द केलेली 'राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा' (नीट) येत्या २१ जून रोजी पुन्हा घेतली जाणार आहे. या केंद्रीय पुनर्परीक्षेच्या पार्श्र्वभूमीवर, महाराष्ट्रातील परीक्षा केंद्रांचे नियोजन चोख ठेवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी 'वर्षा' निवासस्थानी राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सविस्तर आढावा घेतला.'राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा' (नीट) देणाऱ्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी पारदर्शक आणि तणावरहित वातावरण असावे. सर्व यंत्रणांनी सतर्क राहून परीक्षा केंद्रांवर आवश्यक उपाययोजना करून कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये, यासाठी अधिक दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. या बैठकीला 'एनटीए'चे महासंचालक अभिषेक सिंह हे देखील उपस्थित होते. त्यांनी सादरीकरणाद्वारे महाराष्ट्रातील परीक्षा केंद्रांची संख्या, तिथे उपलब्ध करून दिलेल्या सुविधा आणि राष्ट्रीय स्तरावरून करण्यात आलेल्या नियोजनाची सविस्तर माहिती मुख्यमंत्र्यांना दिली. यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी, राज्यातील पुणे आणि लातूर येथील परीक्षा केंद्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना राज्य पोलिसांना दिल्या. सर्व केंद्रांवरील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवून सायबर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे त्यांनी स्पष्ट केले. पेपरफुटीमुळे निर्माण झालेल्या संवेदनशील वातावरणात विद्यार्थी आणि पालकांमध्ये कोणत्याही प्रकारचा संभ्रम निर्माण होऊ नये, यासाठी सोशल मीडियावरील अफवांना तातडीने आळा घालण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी सायबर विभागाला दिले. तसेच, परीक्षेच्या दिवशी जून महिन्यातील पावसाची शक्यता लक्षात घेऊन वॉटरप्रूफिंग, अखंडित वीजपुरवठा, पिण्याचे पाणी आणि वाहतूक नियोजन चोख ठेवण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत.

## महिला कर्मचाऱ्याची सहकाऱ्याकडून हत्या

वृत्तसंस्था

मोहाली : पंजाबमधील मोहाली येथून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. एका खासगी कंपनीत काम करणाऱ्या महिलेची तिच्याच सहकाऱ्याने चाकूने वार करून हत्या (चींवशी) केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेनतर मोहाली परिसरात एकच खळबळ उडाली आहे. हरविंद मन्न असं आरोपीचे नाव आहे.

प्राथमिक माहितीनुसार, आरोपी आणि मृत महिला यांच्यात पूर्वी मैत्रीपूर्ण संबंध होते. मात्र, काही वैयक्तिक कारणांमुळे दोघांमध्ये वाद निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. ही घटना गुरुवारी संध्याकाळी कंपनीच्या कार्यालयात घडली. तरुणी नेहमीप्रमाणे आपल्या कार्यालयात काम करत होती. काम सुरू असताना आरोपी अचानक कार्यालयात तीचा एक्स बॉयफेंड आला आणि तिच्यावर हल्ला केला.

# ५ लाख मुंबईकर घेणार व्यसनमुक्तीची शपथ

तभा वृत्तसेवा



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहपालक मंत्री तथा कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या पुढाकारातून मुंबई अमली पदार्थमुक्त करण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येत असून, मुंबई शहर व उपनगरांमध्ये ती मोठ्या प्रमाणावर अंमलात आणली जाणार आहे. येत्या २५ जून २०२६ रोजी या मोहिमेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार असून, त्याच दिवशी ५ लाखांहून अधिक मुंबईकर तब्बल ५००० ठिकाणी एकत्र येऊन व्यसनमुक्तीची शपथ घेणार आहेत.महाराष्ट्र दिनानिमित्त या मोहिमेची घोषणा करण्यात आली होती. शाळा, महाविद्यालये, रहिवासी संकुले, हौसिंग सोसायट्या तसेच विविधया मोहिमेच्या तयारीसंदर्भात मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आज मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार आणि संबंधित अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली.

यावेळी मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले, व्यसनमुक्त मुंबई घडवणे हे सरकार, शासन, समाजाच्या सक्रिय सहभागातूनच हे शक्य होणार आहे. आपल्या पुढील पिढीचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने या मोहिमेत सहभागी होणे अत्यंत गरजेचे आहे. ही एक लोकचळवळ आहे आणि यातून निश्र्चितच सकारात्मक परिवर्तन घडेल.या उपक्रमामुळे युवकांमध्ये जनजागृती वाढून अमली पदार्थांविरोधात मजबूत सामाजिक वातावरण निर्माण होईल, असा विश्र्वास लोढा यांनी व्यक्त केला आहे.

# बालभारतीची नवी पुस्तके हायटेक !

तभा वृत्तसेवा




२ री. ३ री. ४ थी अन ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन नियम

पुणे :राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२०च्या अनुषंगाने राज्यातील विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेली इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीची नवी पाठ्यपुस्तके यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांच्या हाती पडणार आहेत. त्यात गोष्टींच्या माध्यमातून शिक्षण, भारतीय ज्ञान प्रणाली, जीवनकौशल्ये, मूल्यशिक्षण, संविधानिक मूल्ये आणि सर्वसमावेशक शिक्षणाला विशेष प्राधान्य देण्यात आल्याची माहिती विषयतज्ज्ञांनी दिली. पाठ्यपुस्तकांच्या आशयाची निवड विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार आणि अध्ययन निष्पत्तीच्या अनुषंगाने केली आहे. प्रत्येक पुस्तकाच्या सुरुवातीलाच अध्ययन निष्पत्ती आणि त्यानुसार असलेला आशय यांचा ताळमेळ स्पष्ट करणारा तक्ता दिला आहे. शिक्षकांना अध्यापन सुलभ व्हावे, यासाठी प्रत्येक पाठ, आशय आणि उपक्रमांसोबत आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.'एनईपी'नुसार विविध विषयांमध्ये भारतीय ज्ञान प्रणालीशी संबंधित माहितीचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण, सर्जनशील लेखन, संवादकौशल्य, नेतृत्व, सहकार्य आणि जिज्ञासा यांसारख्या कौशल्यांचा विकास व्हावा, यासाठी विविध उपक्रमांचा समावेश केला आहे. मूल्यांकन प्रक्रियेतही ज्ञानात्मक, आकलनात्मक, विश्र्लेषणात्मक, उपयोजनात्मक आणि निर्मितीआधारित स्वाध्यायांना स्थान दिले आहे. नागरिकांची मूलभूत कर्तव्ये, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदाऱ्यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकतेसाठी स्वतंत्र आशय दिला आहे.

# कर्नाटक काँग्रेसमध्ये कलह वाढला

वृत्तसंस्था

बंगळुरू : कर्नाटक काँग्रेसमध्ये अंतर्गत कलह वाढला आहे. मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या मंत्रिमंडळातील एका सदस्याने शपथविधी होऊन काही तास उलटत नाहीत तोच राजीनामा दिला आहे. मंत्री रामलिंगा रेड्डी यांच्या राजीनाम्यानंतर बिघडलेली परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार करत आहेत.

खातेवाटपाच्या मुद्यावरून नाराज झालेल्या रामलिंगा रेड्डी यांनी शपथ घेतल्यानंतर अवघ्या काही तासांतच मंत्रिपदाचा राजीनामा सादर केला. आता मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार रामलिंगा रेड्डी यांच्याशी चर्चा करून तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे वृत्त आहे. या पार्श्र्वभूमीवर मंत्री प्रियांक खर्गे यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना केलेले वक्तव्य राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय झाले आहे.

सरकारच्या स्थापनेला अजून जास्त काळ झालेला नाही. काही मतभेदाचे मुद्दे असल्यास चर्चेतून तोडगा काढला जाऊ शकतो. आवश्यकता भासल्यास पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या मदतीने चर्चा करून तोडगा काढता येईल, असे मंत्री प्रियांक खर्गे म्हणाले. सरकार आणि संघटनेवर परिणाम होऊ नये यासाठी चर्चेतून मार्ग काढणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.कर्नाटकमधील नव्या सरकारमध्ये रामलिंगा रेड्डी यांना जलसंपदा विभाग देण्यात आला. मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी हे खातेपाटप केले आहे.

# 'मला जनतेत जाऊन, त्यांच्यात राहून त्यांचा सोबत चालायचं आहे : अण्णामलाई

वृत्तसंस्था

चेन्नई: भारतीय जनता पक्षात गेल्या १२ वर्षांपासून जोरदार इन्कमिंग सुरू आहे. केंद्रातील सगल सत्ता, अनेक राज्यांमध्ये सरकारं असल्यानं काँग्रेससह विरोधी पक्षातील अनेक दिग्गजांनी भाजपची वाट धरली. पण भाजपचे तामिळनाडूचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई या सगळ्या नेत्यांना अपवाद ठरले. त्यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिली आहे. विशेष म्हणजे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांची भेट घेऊन त्यांनी पक्ष सोडण्याची घोषणा केली. त्यांच्या या सामंजस्यपूर्ण भेटीगाठींची बरीच चर्चा रंगली.

भाजपला रामराम केल्यावर अण्णामलाई यांनी त्यांचा पुढील प्लान सांगितला. तमिळनाडूत एका राजकीय आंदोलनाची सुरुवात करणार असल्याची घोषणा त्यांनी केली. भाजप सोडण्यामागील कारणांचा उलगडा अण्णामलाई यांनी केला. 'मला जनतेत जाऊन, त्यांच्यात राहून त्यांचा सोबत चालायचं आहे. भाजपनं तमिळनाडूत प्रत्येक निवडणूक लढवावी, अशी माझी तीव्र इच्छा होती. मी तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांना याबद्दल सांगितलं होतं. स्थानिक स्वराज्य संस्थांसह अन्य निवडणुकाही भाजपनं स्वबळावर लढायला हव्यात, हा विचार मी त्यांच्याकडून बोलून दाखवला होता,' असं अण्णामलाई यांनी सांगितलं.





आपण राजकारणातून संन्यास घेत नसून जमिनीवर एक मोठं राजकीय आंदोलन सुरू करत असल्याची माहिती अण्णामलाई यांनी दिली. त्यांनी सोशल मीडियावरुन 'अण्णामलाई मक्कल इयक्कम- -चख' ची घोषणा केली. 'अण्णामलाई मक्कल इयक्कमला अपेक्षेपेक्षा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. यासाठी आतापर्यंत तीन हजारांहून अधिक जणांनी नोंदणी केली आहे. लोकांना आमच्याकडून अपेक्षा आहेत. त्यांचा आमच्यावर विश्र्वास आहे. आमची टीम येत्या काही दिवसांत प्रत्येक स्वयंसेवकाशी संपर्क साधेल,' अशी माहिती अण्णामलाई यांनी दिली.

एकीकडे अण्णामलाई यांनी भाजपला रामराम करत आपला वेगळा मार्ग निवडलेला आहे. तर दुसरीकडे भाजपनं आंध्र प्रदेश संदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. अण्णामलाई यांना पक्षात कायम ठेवण्यासाठी भाजपकडून बरेच प्रयत्न झाले. पण सगळे प्रयत्न व्यर्थ ठरले. अखेर भाजपनं आंध्र प्रदेशातील रिक्त होत असलेल्या राज्यसभेच्या चारही जागा मित्रपक्षांना सोडल्या आहेत.

आंध्र प्रदेशातून रिक्त होत असलेल्या चार जागांसाठी २-१-१ चा फॉर्म्युला चर्चेत होता. एनडीएतील घटक पक्ष टीडीपीला २, पवन कल्याण यांच्या जनसेना आणि भाजपला प्रत्येकी १-१ असा फॉर्म्युला जवळपास निश्र्चित होता. पण आता तसं होताना दिसत नाही. आंध्र प्रदेशातील राज्यसभेच्या चारही जागा भाजपनं मित्रपक्षांना सोडून दिल्या आहेत. याचा संदर्भ तमिळनाडूतील बदलत्या राजकीय घटनाक्रमाशी जोडला जात आहे. तामिळनाडूचे माजी प्रदेशाध्यक्ष अण्णामलाई यांनी भाजप सोडल्यानं शेजारी राज्य असलेल्या आंध्र प्रदेशच्या राज्यसभेच्या जागांवर भाजप बॅकफूटवर गेला आहे.

भाजपनं एका जागेवरील दावा सोडून दिला. या जागेवरुन भाजप अण्णामलाई यांना राज्यसभेवर पाठवण्याच्या तयारीत होता. पण त्यांनीच पक्षाला रामराम केल्यानं भाजपनं ही जागा मित्रपक्षांसाठी सोडण्याचा निर्णय घेतला. राज्यसभा निवडणुकीच्या जागा वाटपासाठी अमरावतीत बैठक झाली. या बैठकीत जागा वाटपांचं सूत्र ठरलं.

# निलंबनाची पार्श्वभूमी तरीही 'प्रभारी' पदाची मेहेरबानी; परतूरच्या बीडीओंचा कारभार चव्हाट्यावर!

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

परतूर जिल्हा जालना येथील पंचायत समितीचा कारभार सध्या पूर्णपणे रामभरोसे चालला असून, येथील गटविकास अधिकारी (इऊज) राजेश तांगडे यांच्या मनमानी, बेकायदेशीर आणि भ्रष्ट कारभारामुळे तालुक्यातील जनता कमालीची त्रस्त झाली आहे. तांगडे यांच्या विरोधात जिल्हा परिषद जालना आणि विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे अनेक तक्रारी दाखल होऊनही कोणतीही ठोस चौकशी होत नसल्याने, अखेर 'वंचित बहुजन आघाडी'ने या भ्रष्ट कारभाराविरोधात थेट रणशिंग फुकले आहे. या संदर्भात विभागीय आयुक्तांना थेट निवेदन देऊन तात्काळ चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राजेश तांगडे हे दि. ३/१२/२०१६ ते ११/३/२०२६ या कालावधीत प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत असताना, विहिरींच्या कामातील बेकायदेशीर व भ्रष्ट कारभारामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांना निलंबित केले होते. असे असतानाही, दि. १९/६/२०२४ पासून आजतागायत त्यांना पुन्हा त्याच प्रभारी गटविकास अधिकारी पदावर कशाच्या जोरावर बसवण्यात आले, असा तीव्र सवाल उपस्थित होत आहे. कनिष्ठ पदावरील व्यक्तीला वर्ग-१ चा पदभार देता येत नाही आणि दिला तरी तो तात्पुरत्या स्वरूपाचा असावा लागतो. मात्र, तांगडे यांना या पदावर कायम ठेवून भ्रष्ट निर्णय घेण्याची मोकळीक दिली गेल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. धोरणानुसार घरकुल लाभार्थ्यांना मोफत पाच ब्रास रेती उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. यासाठी परतूर तहसील कार्यालयाने गटविकास अधिकारी राजेश तांगडे यांना वारंवार लेखी व तोंडी पत्रव्यवहार केला, चार वेळा स्मरणपत्रे पाठवली. मात्र, तांगडे यांनी तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. पावसाळा तोंडावर आलेला असतानाही अद्याप लाभार्थ्यांची यादी तहसील कार्यालयात सादर केलेली नाही. वरिष्ठांचे आदेश टाळणे आणि गरिबांना वेठीस धरणे हा येथील नित्याचाच कारभार झाला आहे. विभागीय आयुक्तांना सादर केलेल्या निवेदनात पंचायत समितीच्या भ्रष्ट कारभाराचे खालील वाभाडे काढण्यात आले आहेत: तक्रारदारांची अडवणूक: ग्रामपंचायतींमधील भ्रष्टाचाराच्या तक्रारी करणाऱ्या सरपंच किंवा नागरिकांना न्याय देण्याऐवजी सत्ताधारी गटाशी संबंधित आरोपींना पाठीशी घातले जाते. माहिती अधिकाराचा संकोच: अनेक नागरिकांना माहिती अधिकारांतर्गत वेळेत आणि योग्य माहिती दिली जात नाही. कागदोपत्री ग्रामसभा: तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायतींच्या ग्रामसभा केवळ कागदावरच दाखवून बेकायदेशीर कामे मंजूर केली जात आहेत. बेकायदेशीर पदवीधर कार्यक्रम: सत्ताधारी पक्षाचे पदाधिकारी असल्यासारखे गटविकास अधिकारी बेकायदेशीरपणे पदवीधर कार्यक्रमांचे आयोजन व उपस्थिती लावत आहेत १५ व्या वित्त आयोगाचा निधी हडप: परतूर पंचायत समितीला प्राप्त झालेला १५ व्या वित्त आयोगाचा शेष निधी विशिष्ट गावांना ३०% ते ४०% कमिशन घेऊन विकला गेल्याचा संशय आहे. आठवड्यातून पाच दिवस काम करणे बंधनकारक असताना, बी.डी.ओ. साहेब कार्यालयाला नेहमी कुलूप लावून गायब असतात व इतर कर्मचारीही जागेवर नसतात.

### आठ दिवसांत चौकशी न झाल्यास रास्ता रोको!

या संपूर्ण प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन चौकशी समिती नेमण्यात यावी आणि दोषी अधिकाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. येत्या आठ दिवसांत (सहा जून २०२६ पर्यंत) ठोस कारवाई न झाल्यास, वंचित बहुजन आघाडी जालना जिल्ह्याच्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन तसेच रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे होणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी प्रशासनाची असेल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

# सामाजिक कार्यकर्ते डेव्हिड घुमारे यांना बेस्ट नेशन बिल्डर पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल जालना येथील सामाजिक कार्यकर्ते डेव्हिड घुमारे यांना अमेरिकन युनिव्हर्सिटी फॉर ग्लोबल पीस, यूएसए (णत्राण्ड) आणि ग्लोरियस ग्लोबल सोशल फाउंडेशनच्या बेस्ट नेशन बिल्डर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. बुधवारी जालना शहरातील बँकेट सभागृहात हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम गिरी करणाऱ्या ११५ मान्यवरांचाही यावेळी 'ग्लोबल एक्सलन्स अवॉर्ड २०२६' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. अमेरिकन युनिव्हर्सिटी फॉर ग्लोबल पीस, यूएसएचे संस्थापक अध्यक्ष प्रो. डॉ. मधु कृष्णन, प्रो. प्रतिमा कृष्णन, प्रो. डॉ. अनिश विजागत तसेच सौ. ज्युलिया विजागत यांच्या हस्ते सामाजिक कार्यकर्ते डेव्हिड घुमारे यांना सन्मानचिन्ह आणि गौरवपत्र देऊन बेस्ट नेशन बिल्डर पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी घुमारे यांचा परिवारही उपस्थित होता. डेव्हिड घुमारे हे ३५ वर्षापासून सामाजिक कार्यकर्ते म्हणून कार्यरत असून त्यांनी उपेक्षित - वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी विविध आंदोलने केली असून ते वचित बहुजन आघाडीचे जालना जिल्हाध्यक्षही आहेत.

## संक्षिप्त



### जुई मध्यम प्रकल्पातून होणारी पाणी चोरी तात्काळ थांबविण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**

भोकरदन शहरासह तालुक्यातील सुमारे २० ते २५ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या मौजे दानापूर येथील जुई मध्यम प्रकल्पातील पाणी साठा धोकादायक पातळीवर पोहोचला असून धरणातील अवैध पाणी उपसा व पाणी चोरी तात्काळ थांबविण्याची मागणी उपविभागीय अधिकारी, भोकरदन यांच्याकडे करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत जून महिन्यात धरणातील पाणी साठा केवळ अंदाजे १० टक्क्यांपर्यंत शिल्लक राहिला असून पाणी पातळी तळ गाठण्याच्या स्थितीत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत भोकरदन शहरासह तालुक्यातील अनेक गावांवर भीषण पाणीटंचाईचे संकट ओढवण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. भोकरदन शहरातील सुमारे ३५ हजार नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा एकमेव स्रोत जुई मध्यम प्रकल्प आहे. धरणातील उपलब्ध पाणी संपुष्टात आल्यास शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे धरणातून होणारा अवैध पाणी उपसा आणि पाणी चोरी रोखण्यासाठी प्रशासनाने तातडीने विशेष पथक नियुक्त करून नियमांनुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर असून प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन धरणातील उपलब्ध पाणी साठ्याचे संरक्षण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### 'समृद्धी'ने स्वखर्चातून केला शिंदेवडगाव-आवलगाव शेतरस्ता मोकळा; शेतकऱ्यांना दिलासा



**तभा वृत्तसेवा**
**घनसावंगी । प्रतिनिधी**


घनसावंगीअबड मतदारसंघातील शेत पानंद रस्त्यांचे जनक समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील यांनी समृद्धी साखर कारखान्याच्या माध्यमातून स्वखर्चातून हाती घेतलेल्या शिंदेवडगाव ते आवलगाव या २ किलोमीटर शेतरस्त्याचे मातीकाम अखेर पूर्ण झाले आहे. पावसाळा अगदी तोंडावर आलेला असतानाच या रस्त्याचे काम वेळेत पूर्ण झाल्यामुळे परिसरातील शेकडो शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळाला असून, शेतात जाण्या-येण्याचा त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. सतीश घाटगे यांनी घनसावंगी, अंबड व जालना तालुक्यातील २१५ किमी पेक्षा जास्त शेत पानंद रस्ते स्वखर्चातून खुले करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. शेतकऱ्यांना खरीप हंगामात शेतीमाल आणि अवजारांची वाहतूक करताना चिखलाचा मोठा सामना करावा लागतो. ही अडचण लक्षात घेऊन सतीश घाटगे यांनी तातडीने पावले उचलत कारखान्यामार्फत या कामाला गती दिली. केवळ मातीकामावरच न थांबता, हा रस्ता कायमस्वरूपी टिकून राहावा यासाठी आगामी काळात 'मुख्यमंत्री बळीराजा शेत-पानंद रस्ते' योजनेच्या माध्यमातून या रस्त्याचे मजबुतीकरण आणि खडीकरण करून तो अधिक दर्जेदार बनवणार असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले आहे. या शेतकरीभिमुख पुढाकारामुळे शिंदेवडगाव आणि आवलगाव परिसरातील शेतकरी वर्गातून अत्यंत समाधान व्यक्त केले जात आहे. सर्व शेतकऱ्यांनी सतीश घाटगे व कारखाना प्रशासनाचे आभार मानले आहे.

### विशेष संक्षिप्त पुनरीक्षण : मतदारांना पासपोर्ट साईज छायाचित्र तयार ठेवण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सध्या मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (डशिलळरश्र खपींशपीर्ळींश ठर्शींळीळेप-डखठ) अभियान सुरू असून, ज्या मतदारांचे छायाचित्र उपलब्ध नाही, अस्पष्ट आहे, जुने झाले आहे किंवा अद्ययावत करणे आवश्यक आहे, अशा सर्व मतदारांनी आपले अलीकडील पासपोर्ट साईज छायाचित्र तयार ठेवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. मतदार यादीतील माहिती अधिक अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेदरम्यान मतदारांची अचूक ओळख सुनिश्चित करण्यासाठी अद्ययावत छायाचित्रांची आवश्यकता भासणार आहे. मतदारांकडून घेण्यात येणाऱ्या छायाचित्रांचा वापर केवळ अधिकृत निवडणूक कामकाजासाठीच करण्यात येणार आहे.

# पोलिस भरतीचे प्रशिक्षण घेण्याऱ्या मुलीचा खदानीत बुडून मृत्यू



**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**

अबंड येथील वलखेडच्या खदानीत चार जून गुरुवारी सकाळी मत्स्योदरी करिअर अकॅडमी मध्ये शिक्षक व पोलीस भरती प्रशिक्षण घेणाऱ्या मुले व मुली धावण्याचा सराव करण्यासाठी भालगावच्या रोडवर गेलेले होते धावण्याचा सराव पूर्ण झाल्यानंतर ते पोहण्यासाठी वलखेडा येथील खदानीत पोहण्यासाठी उतरल्यात यात तीन मुली पोहण्याचा सराव करीत असतांनाच प्रीती अंशीराम भाकड वय १९ वर्ष रा .देव्हिगव्हाण खू.हिला पोहता येत नसल्याने तसेच तिला पाण्याचा अंदाज न आल्याने ती गुंतली जवळच पोहणाऱ्या मुलींनी आरडा-ओरडा केल्यानंतर ग्रामस्थ व स्थानिकांनी मदत करत दोघीचे प्राण वाचवले मात्र प्रीतीचा मृत्यू झाला. या प्रकरणी उपजिल्हा रुग्णालयात प्रीतीचा मृतदेह आणल्यानंतर प्रीतीच्या वडिलांनी रुग्नेवाहिकेने थेट प्रीतीचा मृतदेह अंबड पोलीस ठाण्यात आणला व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षणामध्ये पोहण्याची कुठलीही अट नसताना प्रीतीस पोहण्यासाठी भाग पाडल्या प्रकरणी मत्स्योदरी करियर अकॅडमीच्या प्रशिक्षकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी त्यांनी केली. यावेळी संतप्त जमाव पोलीस ठाण्यात होता. याप्रकरणी वडिलांच्या फिर्यादी वरण मत्स्योदरी करिअर अकॅडमीचे प्रशिक्षक गोकुळ बारवाल व गणेश वायसे दोघे रा. अबंड यांच्या विरोधात अंबड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता अन्वये कलम १०५/३/५ गुन्हा दाखल झालेला असून दोघां प्रशिक्षकाला अंबड पोलीसांनी तत्काळ ताब्यात घेतले. याप्रकरणी पुढील तपास उपनिरीक्षक नरोटे हे करीत असून. या घटनेमुळे अंबड परिसरात हळूहळू व्यक्त करण्यात येत आहे.

# शेतकऱ्याच्या मुलाचे झी ॲडव्हान्समध्ये परीक्षेमध्ये घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद । प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील पिंपळखुटा येथील सर्वसाधारण अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील शंतनू एकनाथ भालके याने झी ॲडव्हान्स २०३६ परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत गावाचे नाव उज्वल केले आहे. शंतनूने ऑल इंडिया रँकमध्ये ७०२६ वा क्रमांक, तर ईडब्ल्यूएस प्रवर्गात ८३६ वा क्रमांक प्राप्त केला आहे. या यशामुळे त्याला देशातील नामांकित आयआयटी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, शंतनूने पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवून आपल्या जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांचे फळ मिळवले आहे. अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील असलेल्या शंतनूने मर्यादित परिस्थितीतही अभ्यासावर लक्ष केंद्रित करत राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षेत यश संपादन केले. त्याच्या या यशामुळे पिंपळशेंडा परिसरात आनंदाचे वातावरण असून ग्रामस्थ, नातेवाईक व मित्रपरिवाराकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भारतातील आयआयटी महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी झी डव्हान्स ही देशातील सर्वाधिक स्पर्धात्मक आणि आव्हानात्मक परीक्षा मानली जाते. या परीक्षेत यश मिळवून शंतनूने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. शंतनूच्या या यशाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्याच्या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांमध्येही उच्च शिक्षणाबाबत नवी प्रेरणा निर्माण झाली आहे.

# पोलीस ठाणे गोंदी व महसुल पथकाची संयुक्त कारवाई तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**

अबड ४ मे पोलीस ठाणे गोंदी हद्दीत दिनांक ०१/०६/२०२६ ते दिनांक ०४/०६/२०२६ दरम्यान गोदावरी नदीपात्रात अवैध वाळु उत्खनन करुन चोरटी वाहतुक करणारे ०४ इसमांवर पोलीस ठाणे गोंदीचे प्रभारी अधिकारी स.पो.नि अमोल गुरले, स्टाफ व महसुल पथक यांनी संयुक्तरीत्या कारवाई करुन ०३ हायवा व ०१ ट्रॅक्टर यांच्यावर कारवाई करुन एकुण ६४,७५,०००/- रुपयेचा मुद्देमाल जप्त करुन पोलीस ठाणे गोंदी येथे खालील नमुद प्रमाणे वाळु चोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गु.र.क्र. १६९/२०२६ कलम ३०३ (२) बी एन एस सह कलम ४८ (७), (८) महाराष्ट्र जमिन महसुल संहिता गु.र.क्र. १७१/२०२६ कलम ३०३ (२) बी एन एस सह कलम ४ व २१ खाण आणि खनिज (विकास व नियमन) अधिनियम सह कलम ४८ (७), (८) महाराष्ट्र जमिन महसुल संहिता गु.र.क्र. १७२/२०२६ कलम ३०३(२) बी एन एस सह कलम ४ व २१ खाण आणि खनिज (विकास व नियमन) अधिनियम सह कलम ४८ (७), (८) महाराष्ट्र जमिन महसुल संहिता सदर गुन्हयात आरोपी नामे १) अजय गणेश दाभाडे वय २५ वर्षे रा. हिंगागाव ता. गेवराई जि. बीड २) बालाजी शामराव बांड वय ५५ वर्षे रा. मुसापुरी ता.जि. बीड ३) बाळासाहेब बबन नागरगोजे रा. भाग्यनगर गोंदी ता. अंबड जि.जालना ४) पवन शिवाजी मिरकर वय २१ वर्षे रा. पांगरखेडा ता. अंबड जि. जालना यांच्यावर वर नमुद गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदरची कारवाई मा.श्री तेघबीर सिंह संधु, पोलीस अधिक्षक जालना, मा.श्री विक्रम साळी, अपर पोलीस अधिक्षक जालना, मा.श्री सिध्देश्वर धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग अंबड यांच्या मार्गदर्शनाखाली गोंदी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी स.पो.नि अमोल गुरले, पोउपनि एस.एम मुपडे, पोउपनि एच.एन जंगले, पोउपनि बी.यु पद्मणे, पोउपनि के.आर हावले, सहा. फौ एफ बी हजारे, पो.ह. आर.व्ही. केंद्रे, पो.शि दिपक भोजणे, पो.शि अब्दुल वहाब, पो.शि एस एस सय्यद, पो.शि चालक ज्योतीलाल राठोड, एस एस साठे यांनी केली आहे.

# पत्रकार हल्ला प्रकरणी कठोर कारवाईची मागणी

## मंठा तालुका मराठी पत्रकार संघाच्यावतीने प्रशासनाला निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

दैनिक जगाचा जगमित्रचे संपादक पत्रकार संतोष भुतेकर यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ मंठा तालुका पत्रकार संघाच्यावतीने तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि. २ जून २०२६ रोजी जालना येथे काही अज्ञात व्यक्तींनी नियोजनबद्ध पद्धतीने संतोष भुतेकर यांच्यावर हल्ला केला. या घटनेमुळे पत्रकारांमध्ये भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर गंभीर आघात झाला आहे. पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून समाजातील विविध समस्या, अन्याय, भ्रष्टाचार आणि जनहिताचे प्रश्न शासन व जनतेसमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. अशा परिस्थितीत पत्रकारांवर होणारे हल्ले हे केवळ एका व्यक्तीवरील हल्ले नसून लोकशाही मूल्यांवर व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर केलेले आक्रमण असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पत्रकार बांधवांनी प्रशासनाकडे हल्ल्यामागील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि पत्रकारांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. या निवेदनावर मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष दिनेश जोशी, मंठा तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नागेश कुलकर्णी , ज्येष्ठ पत्रकार कृष्णा भावसार, उपाध्यक्ष रणजीत बोराडे, ज्येष्ठ सदस्य तुकारामजी मुळे, हाफेज शबाब बागवान, जगदीश राठोड, महादेव पारखे,राम बोराडे केशवराव येऊन यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जलसंवर्धन ही काळाची गरज; युवकांनी पुढाकार घ्यावा -मित्तल

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

माय भारत, जालना, यशदा, युनिसेफ आणि पाथ्रीकर कॅम्पस, बदनापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'जलदिंडी अभियानाचा' समारोप जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर पाडळी (ता. बदनापूर) येथे उत्साहात संपन्न झाला. दि. १ ते ५ जून, २०२६ या कालावधीत बदनापूर तालुक्यातील विविध गावांमध्ये राबविण्यात आलेल्या या अभियानाद्वारे जलसंवर्धन, जलसाक्षरता आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्षाला जलदान करून आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश देत अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी अशीमा मित्तल उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी पाथ्रीकर कॅम्पसचे संचालक डॉ. देवेशजी पाथ्रीकर होते. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजू, जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे, तहसीलदार अतुल बने, डॉ. रामदास निहाळ, अमृत तारो आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.





कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांचा तुळशीच्या रोपांचे वितरण करून सत्कार करण्यात आला. यावेळी जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, जलव्यवस्थापन आणि वृक्षसंवर्धन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वाढते जलसंकट, भूजल पातळीतील सातत्याने होत असलेली घट आणि हवामान बदलाचे वाढते परिणाम लक्षात घेता युवकांनी जलसंवर्धनासाठी पुढाकार घेणे काळाची गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, आजच्या बदलत्या हवामान परिस्थितीत जलसंवर्धन आणि जलसाक्षरता ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली आहे. युवकांनी निसर्गाशी एकरूप होत पाणी बचत, वृक्षलागवड, पर्यावरण संवर्धन आणि जलव्यवस्थापनाबाबत समाजामध्ये व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे. भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित जलसंपत्ती निर्माण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजू यांनी युवकांना संबोधित करताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जल व्यवस्थापनाच्या कार्याचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, शिवकालीन किल्ले, तलाव, बंधारे आणि जलसाठवण व्यवस्था आजही जलसंवर्धनाचे आदर्श उदाहरण आहेत.

आधुनिक काळातही त्या पद्धतींचा अभ्यास करून जलसंधारणाच्या कामांना गती देण्याची आवश्यकता आहे. यावेळी जलदिंडी अभियानात सहभागी स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर करून ग्रामस्थांना पाणी बचत, जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश दिला. पथनाट्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच विविध गावांमध्ये रॅली, जनजागृती फेऱ्या, संवाद सत्रे आणि प्रत्यक्ष प्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे यांनी सांगितले की, जलदिंडी अभियान दि. १ ते ५ जून दरम्यान सोमठाणा, निकळक, अकोला, देवगाव, कुसळी, मात्रेवाडी, सेलगाव आणि पाडळी या गावांमध्ये यशस्वीरित्या राबविण्यात आले. या अभियानाद्वारे युवक, महिला, शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये जलसाक्षरतेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

समारोपप्रसंगी अध्यक्षीय भाषणात डॉ. देवेशजी पाथ्रीकर यांनी जलसंवर्धनाबरोबरच वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. वृक्षलागवड केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता त्याचे जतन, संगोपन आणि संवर्धन होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. युवकांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने कार्यरत राहावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहारा सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष बी. एस. सय्यद यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामसेवक पवन अवघन, पोलीस पाटील भाग्यश्री शेळके, अविनाश शेळके, युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड, तेजस जनविकास संस्थेचे अध्यक्ष शिवाजी तायडे, प्रा. अविनाश हटकर तसेच विविध स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास गावकरी, महिला, युवक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# परभणीच्या कृषि विद्यापीठाची राष्ट्रीय स्तरावर झेप

## आयआयआरएफ-२०२६ क्रमवारीत महाराष्ट्रात प्रथम, देशात ३४ वा क्रमांक

**परभणी,/प्रतिनिधी:-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने भारतीय शैक्षणिक संस्था मूल्यांकन प्रणाली २०२६ च्या कृषि व उद्यानविद्या विद्यापीठांच्या श्रेणीत महाराष्ट्रात प्रथम तर राष्ट्रीय स्तरावर ३४वा क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. नवी दिल्लीस्थित आयआयआरएफ सेंटर फॉर इन्स्टिट्यूशनल रिसर्च तर्फे ही क्रमवारी जाहीर करण्यात आली असून, विद्यापीठाला ३ जून २०२६ रोजी अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

आयआयआरएफ ही देशातील उच्च शिक्षण संस्थांची स्वतंत्र आणि संशोधनाधिष्ठित मूल्यांकन प्रणाली मानली जाते. शिक्षणाची गुणवत्ता, संशोधन कार्य, नवोपक्रम, पायाभूत सुविधा, विद्यार्थी सुविधा आणि विस्तार उपक्रम यांसारख्या विविध निकषांच्या आधारे विद्यापीठांचे मूल्यमापन केले जाते. कृषि व उद्यानविद्या विद्यापीठांच्या श्रेणीत मिळालेले हे स्थान विद्यापीठासाठी विशेष मानाचे मानले जात आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) इंद्र मणी यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण, संशोधन, विस्तार आणि नवोपक्रम क्षेत्रात सातत्याने केलेल्या गुणवत्तापूर्ण कार्याची ही पावती असल्याची भावना विद्यापीठ परिवाराने व्यक्त केली आहे. या यशाचे श्रेय विद्यापीठातील शिक्षक, शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सामूहिक प्रयत्नांना जात असल्याचे कुलगुरूंनी सांगितले. तसेच महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे आणि विद्यापीठाच्या विविध परिषदांच्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.



शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला चालना देण्यात आली आहे. तसेच २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात आयोजित परिसर मुलाखतींच्या माध्यमातून सुमारे १८० विद्यार्थ्यांना शासकीय व खासगी क्षेत्रातील विविध संस्थांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यात आला.

मागील काही वर्षांत विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी आधुनिक सुविधा, वसतिगृहांची दुरुस्ती, अंतर्गत रस्त्यांचे नूतनीकरण, सीएसआर निधीतून महाराष्ट्र यांत्रिकीकरण केंद्राची स्थापना, कौशल्य विकास उपक्रम आणि कॉमन इन्क्युबेशन सेंटरची उभारणी यांसारखे महत्त्वपूर्ण उपक्रम राबविले आहेत. तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, सहाव्या अधिष्ठाता समितीचे अभ्यासक्रम आणि बीएसएमए पदव्युत्तर अभ्यासक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, भारतीय कृषि अनुसंधान परिषद (आयसीएआर) अंतर्गत राष्ट्रीय कृषि शिक्षण अधिस्वीकृती मंडळाकडून १६ मे २०२५ रोजी विद्यापीठाला अधिस्वीकृतीसाठी उच्चांकी ३.२१ गुण मिळाले असून 'ए-ग्रेड' उत्कृष्ट मानांकन प्राप्त झाले आहे. याशिवाय विद्यापीठाच्या दहा संशोधन केंद्रांनी राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळविला आहे.

बाह्यस्त्रोत निधीतून राबविण्यात येणारे संशोधन प्रकल्प, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी सामंजस्य करार, 'माझा एक दिवस माझ्या बळिराजासोबत' हा अभिनव उपक्रम, ऑनलाइन शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद तसेच नवीन पीक वाण, कृषी अवजारे आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार यामुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक व संशोधन कार्याला नवी गती मिळाली आहे. या सर्व प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम आयआयआरएफ क्रमवारीत दिसून आल्याचे मानले जात आहे.

या यशामध्ये शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, कुलसचिव पुरभा काळे, नियंत्रक अनंत कदम, विद्यापीठ अभियंता श्री. दीपक कशाळकर तसेच सर्व महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

या क्रमवारीसाठी आवश्यक माहितीचे संकलन व सादरीकरण शिक्षण संचालनालयातील तांत्रिक अधिकारी तथा विभागप्रमुख डॉ. सचिन मोरे आणि तांत्रिक अधिकारी डॉ. गणपत कोटे यांनी केले. विद्यापीठाच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### जनगणना प्रशिक्षणास दांडी मारणाऱ्या प्रगणक व पर्यवेक्षकांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश : महानगरपालिका प्रशासनाची कठोर भूमिका

**परभणी,/प्रतिनिधी :** जनगणना प्रक्रियेसाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमास अनुपस्थित राहणाऱ्या प्रगणक व पर्यवेक्षकांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश महापालिका प्रशासनाने दिले आहे.

महानगरपालिकेच्या जनगणना विभागामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षकांच्या कामकाजाबाबत गंभीर बाब समोर आली असून, जनगणना प्रक्रियेसाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमास काही प्रगणक व पर्यवेक्षक अनुपस्थित राहिल्याचे निदर्शनास आले आहे. जनगणना ही केंद्र शासनाची अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील प्रक्रिया असल्याने प्रशिक्षणास अनुपस्थित राहण्याची बाब प्रशासनाने गांभीर्याने घेतली आहे. संबंधित प्रगणक व पर्यवेक्षकांकडून जनगणनेची कामे टाळण्याचा प्रयत्न होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आल्याने त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासंदर्भात प्रभाग समिती-अ चे चार्ज अधिकारी जुबेस हाश्मी, प्रभाग समिती-ब चे चार्ज अधिकारी अल्केश देशमुख, प्रभाग समिती-क चे चार्ज अधिकारी आवेज हाश्मी तसेच संबंधित प्रभाग समित्यांना आवश्यक ती माहिती पोलीस ठाण्यात सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधितांवर कायद्यातील तरतुदीनुसार कायदेशीर गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

जनगणना प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा अथवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नसून, नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. हे आदेश आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी यांच्या निर्देशानुसार देण्यात आल्याची माहिती महानगरपालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

### परभणीत अनधिकृत बॅनर, फलक व होर्डिंग्जवर कारवाईचे आदेश : आयुक्त नितीन नार्वेकर व उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे यांचे महानगरपालिका प्रशासनाला निर्देश

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील विनापरवानगी लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर, फलक आणि होर्डिंग्ज तात्काळ हटवून संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देश महानगरपालिकेचे आयुक्त नितीन नार्वेकर आणि उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे यांनी दिले आहेत.

याबाबत महानगरपालिका प्रशासनाला जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती अ, ब आणि क मधील अधिकारी, शाखा अभियंते, कनिष्ठ अभियंते, मुख्य स्वच्छता निरीक्षक (सीएसआय) तसेच स्वच्छता निरीक्षक (एसआय) यांना शहरातील राजकीय, धार्मिक आणि व्यावसायिक स्वरूपाचे विनापरवानगी लावण्यात आलेले बॅनर व फलक तातडीने हटविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच संबंधित व्यक्ती व संस्थांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यासही सांगण्यात आले आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध भागांचे कच्चे ऑडिट करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. प्रभाग समितीअंतर्गत संबंधित अभियंत्यांनी पाहणी करून त्याचा सविस्तर अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय शहरातील मालमत्ताधारक तसेच होर्डिंग एजन्सींना आवश्यक त्या नोटिसा बजावण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

विनापरवानगी उभारण्यात आलेली होर्डिंग्ज तात्काळ काढून टाकण्यासाठी मुख्य स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक आणि अभियंता यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. शहराचे सौंदर्य, वाहतूक सुरक्षितता आणि पावसाळ्यातील संभाव्य धोके लक्षात घेऊन ही मोहीम राबविण्यात येत असल्याचे महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शहरातील अनधिकृत जाहिरात फलक आणि होर्डिंग्जविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे आयुक्त नितीन नार्वेकर आणि उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे यांनी आदेशात नमूद केले आहे.

### सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**परभणी,/प्रतिनिधी :** मुलगी झाल्याने टोमणे मारणे, माहेरहून पैसे आणण्याची मागणी करणे तसेच सतत मानसिक छळ केल्यामुळे त्रस्त झालेल्या २८ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना परभणी येथील पोलीस वसाहतीत घडली. या प्रकरणी पतीसह सासरच्या मंडळींविरुद्ध नानलपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनम संदीप साळवे (वय २८) असे मृत विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी जयश्री वसंते यांनी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, सोनम यांचे लग्न पोलीस शिपाई संदीप साळवे यांच्याशी झाले होते. लग्नानंतर काही दिवस सर्व काही सुरळीत सुरू होते. मात्र मुलगी जन्माला आल्यानंतर सासरच्या मंडळींकडून तिचा मानसिक छळ सुरू झाला. तुला मुलगी कशी झाली, मुलगा का झाला नाही अशा स्वरूपाचे टोमणे मारले जात होते.

## विधान परिषद निवडणूकीत तीन उमेदवार निवडणूक रिंगणात

**परभणी,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुक-२०२६ साठी एकूण ३ उमेदवार निवडणूक लढविणार आहेत. तर ४ उमेदवारांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे.




निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे नाव व पक्ष पुढील प्रमाणे आहेत. विवेक पांडुरंग नावंदर, पक्ष-शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे), सईद खान शेरगुल खान, पक्ष शिवसेना आणि सुशिलकुमार सुरेशराव देशमुख (अपक्ष). उमेदवारी अर्ज मागे घेतलेल्या उमेदवारांचे नावे पुढील प्रमाणे आहेत. संग्राम प्रतापराव जामकर, बुधवंत विश्वजित मनोहर, मेहराज खान शेरगुल खान पठाण आणि विजय रावसाहेब जामकर. सर्व उमेदवार अपक्ष आहेत.

## खरीप हंगामातील पिकविमा पंधरा दिवसांच्या आत वितरित करा : डोंगरी जनपरिषदेची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी-** गंगाखेड तालुक्यातील डोंगरी भागातील माखणी, पिंपळदरी व राणीसावरगाव महसूल मंडळातील शेतकऱ्यांना २०२५ च्या खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन व तूर पिकाचा विमा पंधरा दिवसांच्या आत वितरित करण्यात यावा, अशी मागणी डोंगरी जनपरिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा २२ जून २०२६ रोजी गंगाखेड येथे मोठा रुमणे मोर्चा काढून धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

डोंगरी जनपरिषदेचे मुख्य संयोजक पंडितराव घरजाळे, संयोजक नामदेव सानप, पंडित निवृत्ती सोडगीर, चिंतामणी बन्नर, महारुद्र सावंत यांच्यासह डोंगरी भागातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने या संदर्भातील निवेदन गुरुवारी (दि. ४) जिल्हाधिकारी व जिल्हा कृषी अधीक्षक यांना सादर केले. त्याद्वारे, भारतीय कृषी विमा कंपनीला तातडीने आदेश देऊन २०२५ च्या खरीप हंगामातील पिक विम्याची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही अद्याप विमा मिळालेला नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. याशिवाय २०२४ पर्यंत पीक विमा नुकसानभरपाईसाठी लागू असलेले चार ट्रिगर निकष २०२६ च्या खरीप हंगामातील पीक विमा योजनेसाठीही लागू करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

मागण्या मान्य न झाल्यास डोंगरी भागातील शेतकरी २२ जून रोजी गंगाखेडच्या मोंढा मार्केट येथून उपविभागीय अधिकारी कार्यालयावर रुमणे मोर्चा काढतील. तसेच मोठ्या संख्येने लेखी तक्रारी दाखल करून आगामी खरीप हंगामातील पीक विमा भरण्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेणार असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या प्रलंबित पीक विम्याच्या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## एस.आय.आर. नोंदणीसाठी घरी येणाऱ्या बीएलओला सहकार्य करा-शैलेश लाहोटी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** गंगाखेड तालुक्यातील डोंगरी भागातील माखणी, पिंपळदरी व राणीसावरगाव महसूल मंडळातील शेतकऱ्यांना २०२५ च्या खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन व तूर पिकाचा विमा पंधरा दिवसांच्या आत वितरित करण्यात यावा, अशी मागणी डोंगरी जनपरिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा २२ जून २०२६ रोजी गंगाखेड येथे मोठा रुमणे मोर्चा काढून धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.



डोंगरी जनपरिषदेचे मुख्य संयोजक पंडितराव घरजाळे, संयोजक नामदेव सानप, पंडित निवृत्ती सोडगीर, चिंतामणी बन्नर, महारुद्र सावंत यांच्यासह डोंगरी भागातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने या संदर्भातील निवेदन गुरुवारी (दि. ४) जिल्हाधिकारी व जिल्हा कृषी अधीक्षक यांना सादर केले. त्याद्वारे, भारतीय कृषी विमा कंपनीला तातडीने आदेश देऊन २०२५ च्या खरीप हंगामातील पिक विम्याची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही अद्याप विमा मिळालेला नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. याशिवाय २०२४ पर्यंत पीक विमा नुकसानभरपाईसाठी लागू असलेले चार ट्रिगर निकष २०२६ च्या खरीप हंगामातील पीक विमा योजनेसाठीही लागू करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

मागण्या मान्य न झाल्यास डोंगरी भागातील शेतकरी २२ जून रोजी गंगाखेडच्या मोंढा मार्केट येथून उपविभागीय अधिकारी कार्यालयावर रुमणे मोर्चा काढतील. तसेच मोठ्या संख्येने लेखी तक्रारी दाखल करून आगामी खरीप हंगामातील पीक विमा भरण्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेणार असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या प्रलंबित पीक विम्याच्या प्रश्नावर प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

## पर्यावरण संरक्षणासह शारीरिक तंदुरुस्तीसाठी नियमित सायकलचा वापर गरजेचा : डॉ. केदार खटींग यांचे प्रतिपादन

**परभणी,/प्रतिनिधी-** पर्यावरण संरक्षणासाठी तसेच शारीरिक तंदुरुस्तीसाठी नागरिकांनी नियमित सायकलचा वापर करावा, असे आवाहन डॉ. केदार खटींग यांनी केले.

पर्यावरण संवर्धनासोबतच निरोगी आरोग्यासाठी सायकल चालविण्याचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जागतिक सायकल दिन आणि जागतिक पर्यावरण दिनानिमित्त परभणी शहरात केंद्र सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या 'माय भारत' उपक्रमांतर्गत तसेच परभणी सायकल ग्रुपच्या वतीने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीस जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर, परभणी सायकल ग्रुपचे अध्यक्ष डॉ. केदार खटिंग, जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे, पोलीस अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून रॅलीला प्रारंभ झाला. शिवाजी चौक, महात्मा फुले पुतळा, वसमत रोड, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परिसर मार्गे ही रॅली राजगोपालाचारी उद्यान येथे पोहोचली. तेथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना परभणी सायकल ग्रुपचे अध्यक्ष डॉ. केदार खटिंग यांनी सायकल चालविण्याचे आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक फायदे अधोरेखित केले. पर्यावरण संरक्षणासाठी तसेच शारीरिक तंदुरुस्तीसाठी नागरिकांनी नियमित सायकलचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. वाढते प्रदूषण आणि पेट्रोल-डिझेलवरील वाढता ताण लक्षात घेता दैनंदिन कामांसाठी शक्य तितका सायकलचा वापर करावा आणि वाहनांचा वापर कमी करून पर्यावरण संवर्धनात योगदान द्यावे, असेही त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या सायकल वापराच्या आवाहनाला नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे मतही त्यांनी व्यक्त केले.

या सायकल रॅलीमध्ये डॉ. राम पवार, ओम शेठ तलरेजा, ज्ञानराज खटिंग, डॉ. चंद्रशेखर भालेराव, नितीन लोहट, प्रद्युम्न शिंदे यांच्यासह शहरातील डॉक्टर, शिक्षक, व्यापारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने सायकलप्रेमींनी सहभाग नोंदविला. रॅलीमधून पर्यावरण संरक्षण, इंधन बचत आणि निरोगी जीवनशैलीचा प्रभावी संदेश देण्यात आला.

## पालकमंत्री यांच्यासोबत जिंतूर तालुक्यातील पाणीटंचाई व घरकुल संदर्भात चर्चा

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर येथे परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट तथा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्या संपर्क कार्यालय येथे पालकमंत्री यांची भेट घेऊन जिंतूर पंचायत समितीचे सभापती किशोर भाऊ खिस्ते व उपसभापती माधवराव दराडे व सर्व सन्माननीय पंचायत समिती सदस्य ईटोली येथील सरपंच जगदीश राव घुगे पाटील यांनी जिंतूर तालुक्यात पाणीटंचाई यासंदर्भात व घरकुल यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

घरकुल योजनेला गेल्या काही दिवसापासून बजेट नसल्यामुळे लाभार्थ्यांनी आपले घरकुल थाटामाटाने कर्ज काढून बांधले आहे परंतु काही लाभार्थ्यांना घरकुलाची पहिला व दुसरा हप्ता पडला आहे त्यानंतर पैसे पडले नाही त्यामुळे घरकुल लाभार्थी यांना व ग्रामीण भागातील लाभार्थी यांनी कर्ज काढून आपले घर बांधले आहे शासनाचे वेळोवेळी पैसे येत नसल्यामुळे लाभार्थ्यांना अनेक संकटाला सामोर जावं लागत आहे त्यामुळे पंचायत समितीचे सभापती किशोर खिस्ते व उपसभापती माधवराव दराडे आणि सर्व पंचायत समिती सन्माननीय सदस्य वईटोली येथील सरपंच जगदीश राव घुगे पाटील यांनी पालकमंत्री समोर तालुक्याच्या घरकुलाचा प्रश्न मांडला व पालकमंत्र्यांनी घरकुलाचे हप्ते वेळोवेळी पडतील व शासनाकडून निधी लवकरात लवकर उपलब्ध करून दिल्या जाईल असे सांगण्यात आले तसेच यावर्षी कडकउन्हाळा असल्यामुळे अनेक गावांना पाणीटंचाईला सामना करावा लागत आहे तरी पालकमंत्री महोदय यांनी आपल्या जिंतूर तालुक्याला पाणीटंचाई भासू देऊ नये असा प्रश्न पालकमंत्र्यासमोर त्यांनी मांडला तसेच लगेच पालकमंत्र्यांनी सांगितले की कुठल्याही प्रकारची अडचण येऊ देणार नाही व नागरिकांना पाण्यासाठी भटकंती होणारी ती होऊ देणार नाही असे त्यांनी सांगितले यावेळी पालकमंत्र्यासोबत चर्चा करताना पंचायत समितीचे सभापती किशोर भाऊ खिसते व पंचायत समितीचे उपसभापती माधवराव दराडे वसरपंच जगदीश राव घुगे पाटील उपस्थित होते



## अग्रलेख...

# ममतांचे चिंतन आणि भविष्याची चिंता

गेल्या सुमारे तीन वर्षांपासून महाराष्ट्रात घुमत असलेल्या एका रडगाण्याचे सूर आता थेट पश्चिम बंगालपर्यंत पोहोचले आहेत. आमचा पक्ष चोरला, चिन्ह चोरले, बाप चोरला असा टाहो महाराष्ट्रातील जनता तीन वर्षांपासून ऐकत आली आहे. या काळात पुढे महाराष्ट्रात झालेल्या अनेक निवडणुकांमध्ये पक्षचोरीच्या रडगाण्याला जनतेनेच चोख उत्तर दिले. आता पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीनंतर अपेक्षेप्रमाणे पक्षचोरीचे रडगाणे तेथे घुमू लागले आहे. जेव्हा एखाद्या राजकीय पक्षाच्या नेतृत्वाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्हे उमटतात, तेव्हा ती पुसण्यासाठी अशा रडगाण्यांचे सूर कामी येतात, असे आता महाराष्ट्रापाठोपाठ पश्चिम बंगालमधील राजकारणातून स्पष्ट दिसू लागले आहे. ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसची पाळेमुळे पश्चिम बंगालमधून पुरती उखडली गेली आहेत आणि पक्षाला बंडखोरीच्या साथीने ग्रासले आहे.

ममता बॅनर्जी यांनी ज्या नेत्यास पक्षातून निलंबित केले, त्याच नेत्याच्या पाठीशी या पक्षाच्या तब्बल ५८ आमदारांनी आपली ताकद उभी केली आणि ममता बॅनर्जी व त्यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांना एकाकी पाडून तृणमूलचा ताबा घेतला. गेल्या सुमारे १५ वर्षांपासून पश्चिम बंगालवर सत्ता गाजविणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षात ही उभी फूट पडल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी महाराष्ट्रातील हे रडगाणे तिकडे आळविण्यास सुरुवात केली आहे. पश्चिम बंगालच्या विधानसभेत विजयी झालेल्या ८० पैकी ५८ आमदारांनी स्वतंत्र गट स्थापन करून ऋतुब्रत बॅनर्जी यांची गटनेतेपदी निवड केल्यानंतर त्यांची विरोधी पक्षनेतेपदी झालेली निवड हे ममता बॅनर्जी यांच्या गेल्या २८ वर्षांच्या एकहाती नेतृत्वास दिले गेलेले आजवरचे सर्वात मोठे आव्हान ठरले आहे. बंडखोर गटाने पक्षावर दावा केला आहे आणि ममता बॅनर्जी यांनी पक्षाच्या कारभारापासून दूर राहून केवळ सल्लागाराची भूमिका बजावावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील घडामोडींची पुनरावृत्ती सुरू झाल्यानंतर ममता बॅनर्जी यांना आत्मचिंतनाचा साक्षात्कार झाला असून त्याआधी पक्षातील सर्व विभाग विसर्जित करण्यात आले आहेत. या काळात आपल्या पाठीशी कोण आहे, हे वळून पाहण्याची त्यांना गरजही नाही. निवडणुकीत वाताहत झाल्यानंतर लगेचच ममता बॅनर्जी यांनी निमंत्रित केलेल्या पहिल्या चिंतन बैठकीकडे नऊ आमदारांनी पाठ फिरविली. आजमितीस ८० पैकी ५८ आमदारांनी ममता बॅनर्जींचे नेतृत्व नाकारले आहे. गेल्या महिनाभरात या पक्षात पडद्यामागे अनेक नाट्यमय घडामोडी घडल्यानंतर आता बंडखोर गटास विधिमंडळातील अधिकृत तृणमूल काँग्रेस म्हणून मान्यता मिळाली आहे आणि ममता बॅनर्जी यांनी पक्षावरील ताबा गमावला आहे. ममता सरकारच्या काळात पक्षाला मुठीत ठेवणाऱ्या अभिषेक बॅनर्जी यांना या राज्यातील जनतेपाठोपाठ या गटानेही खड्यासारखे दूर केले. पुढच्या काळात ममता-अभिषेक यांच्या राजकीय नेतृत्वाचे भवितव्य काय असेल, ते स्पष्ट होणार आहे. कारण पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसभोवती घोंघावणारे हे वादळ केवळ विधिमंडळापुरते मर्यादित नाही. संसदेतील या पक्षाच्या खासदारांच्या भूमिकेवर आणि विरोधकांनी भाजपाला रोखण्यासाठी स्थापन केलेल्या इंडिया आघाडीतील तृणमूल काँग्रेसच्या अस्तित्वावरही अनिश्चिततेचे सावट दाटले आहे.

पश्चिम बंगालमध्ये तब्बल १५ वर्षे सत्तेवर असलेल्या तृणमूल काँग्रेसमध्ये वेळोवेळी निर्माण होणारे मतभेद, नाराजीचे सूर काही नव्या बाबी नाहीत. मात्र, आता पडलेल्या फुटीची कारणे वेगळी आहेत. या घडामोडींमुळे ममता बॅनर्जी यांनी स्थापन केलेल्या पक्षाचे संघटनात्मक आरोग्य, ममतांची नेतृत्वशैली आणि त्यांच्यासमोरील भविष्यातील राजकीय आव्हाने स्पष्ट झाली आहेत. कोणत्याही प्रादेशिक पक्षाची प्रतिमा ही त्याच्या नेत्याच्या व्यक्तिगत प्रतिमेशी जोडली गेलेली असते. महाराष्ट्रात शिवसेनेवर बाळासाहेबांच्या प्रतिमेची तर राष्ट्रवादी काँग्रेसवर शरद पवार यांच्या प्रतिमेची छाप होती. तृणमूल काँग्रेसचा तंबू ममता बॅनर्जी यांच्या एकखांबी नेतृत्वावर उभा होता. अशा प्रादेशिक व कुटुंबकेंद्रित पक्षांमध्ये संघटनात्मक नेतृत्वापेक्षा व्यक्तिकेंद्री नेतृत्व अधिक प्रभावी असते. असे दीर्घकाळ चालत राहते, तेव्हा अन्य नेत्यांमध्ये नाराजी मूळ धरू लागते. निर्णयप्रक्रियेत सहभाग मिळत नसल्याची भावना वाढीस लागते, नेतृत्वाच्या संधीचे प्रश्न निर्माण होतात, स्थानिक नेत्यांमध्ये हितसंबंधांचे संघर्ष वाढतात आणि सत्तेतील स्पर्धेतून फुटीची बीजे रुजू लागतात. महाराष्ट्रापाठोपाठ पश्चिम बंगालमध्ये आता तसेच घडताना दिसू लागले आहे. यातूनच काही नेते भाजपामध्ये गेले, काहींनी स्वतंत्र भूमिका घेतली तर काहींनी पक्षांतर्गत नाराजी उघडपणे व्यक्त केली. या घटना पाहता, ममता बॅनर्जी यांच्या अजेय प्रतिमेला मात्र मोठा तडा गेला आहे. २०११ पासून बंगालच्या राजकारणात ममता बॅनर्जी यांचे वर्चस्व निर्विवाद राहिले आहे. या मोठ्या फुटीनंतरही शिल्लक राहिलेल्याच्या निष्ठावंतांचा ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वावर विश्वास आहे. ममता म्हणजेच तृणमूल अशी त्यांची भावना आहे. पक्षातील असंतोषाच्या उद्रेकात हा विश्वास डळमळीत झाला, तर ही भावनाही कमकुवत होऊ शकते. ममता यांचा उत्तराधिकारी मानल्या जाणाऱ्या अभिषेक बॅनर्जी यांच्यावरील जनतेच्या रोषाचा उद्रेक पश्चिम बंगालने नुकताच अनुभवला. आता बंडखोर गटाने तर पक्षाच्या नोंदीतून त्यांचे नाव हटविले आहे. या पक्षाचा जनाधार मानल्या जाणाऱ्या ग्रामीण भागातील जनतेने आणि अल्पसंख्यक पाठीराख्यांनीही ममता बॅनर्जी यांचे नेतृत्व नाकारले, तर या पक्षाचे पक्षचोरीचे रडगाणे कोणीच ऐकून घेणार नाही. त्यामुळे ममता जेव्हा पराभवाचे चिंतन करण्यासाठी सज्ज होतील, तेव्हा त्यांना अन्य राज्यांतील अशा घडामोडींकडे वळून पाहावे लागेल. एकूणच भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांतील फूट किंवा बंड हा अपवाद नाही, तर जवळपास नियमच ठरला आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतील बंडानंतर पक्षाची शकले झाली आणि राजकीय समीकरणे बदलून गेली. बिहारमध्ये नितीश कुमार यांच्या पक्षात अनेकदा अंतर्गत संघर्ष झाले, पण ते शमवून पक्षसंघटना टिकविण्यात त्यांनी यश मिळवले. आंध्र प्रदेशात चंद्राबाबू नायडू यांच्या पक्षातही विविध टप्प्यांवर गटबाजी झाली. परंतु मजबूत संघटनात्मक चौकट असल्याने ती नियंत्रित राहिली. उत्तर प्रदेशातील मुलायम-अखिलेश यांच्यातील संघर्ष हे कौटुंबिक नेतृत्वाच्या वादाचे आणि मर्यादांचेही उदाहरण ठरले होते तर तामिळनाडूमध्ये जयललिता यांच्या निधनानंतर अखिल भारतीय अण्णाद्रमुकमध्ये नेतृत्वाचा संघर्ष उफाळला होता.

पक्षफुटीच्या आणि बंडखोरीच्या या राजकीय घडामोडींमागे काही कारणांचे समान धागे दिसतात. व्यक्तिकेंद्रित नेतृत्वातून निर्माण होणाऱ्या वारसा हक्काचा वाद आणि सत्तेच्या वाटपातील अन्य नेत्यांचा वाटा अशीच काही कारणे बंड आणि फाटाफुटीस कारणीभूत ठरतात असे दिसते. तरीही फूट पडल्यावर किंवा बंड उफाळल्यानंतर त्याचे खापर भाजपावर फोडण्याचा महाराष्ट्रातून सुरू झालेला पायंडा आता थेट पश्चिम बंगालपर्यंत पोहोचला आहे. ममता बॅनर्जी यांनी तेच करण्यास सुरुवात केली असली, तरी त्या जेव्हा पराभवाची मीमांसा करतील आणि पक्षांतर्गत नाराजीची कारणे शोधण्याकरिता चिंतन करतील, तेव्हा त्यांना प्रामाणिकपणे पक्षसंघटनेतील बाबींचाच विचार करावा लागेल. पक्षांतर्गत असंतोष, लोकशाही प्रक्रियेचा अवलंब, नेतृत्वावरील विश्वास टिकविण्याची शैली यामध्ये त्यांना याची बरीचशी उत्तरे सापडतील. भाजपावर आरोप करणे हे राजकीयदृष्ट्या सोयीचे स्पष्टीकरण असू शकते; परंतु ते संपूर्ण सत्य नसते, हे वास्तवही त्यांना स्वीकारावे लागेल. अनेकदा फुटीची कारणे पक्षाच्या घरातच दडलेली असतात. त्यामुळे तृणमूल काँग्रेसमधील फुटीकडे केवळ पश्चिम बंगालमधील एक राजकीय घटना एवढ्याच नजरेने पाहता येणार नाही. भारतीय प्रादेशिक पक्षांतील संघटनात्मक लोकशाहीचा अभाव ही समस्या यातून पुन्हा उघड झाली आहे. कोणताही प्रादेशिक पक्ष जोपर्यंत एका व्यक्तीभोवती केंद्रित झालेला असेल, तोपर्यंत फूट, बंड, गटबाजी आणि उत्तराधिकारी संघर्ष हे अटळ राहतील.

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# भाडे करार करताना कोणता पर्याय योग्य?

आजच्या काळात घर, फ्लॅट, कार्यालय, दुकान, गोडाऊन, औद्योगिक जागा किंवा व्यावसायिक मालमत्ता भाड्याने देताना किंवा घेताना 'भाडे करार' हा शब्द सहजपणे वापरला जातो. अनेक वेळा मालक, भाडेकरू आणि अगदी काही व्यवहारांमध्ये मध्यस्थ रजा आणि परवाना, भाडेपट्टा आणि भाडे करार या संज्ञा एकाच अर्थाने वापरताना दिसतात. प्रत्यक्षात या तिन्ही संकल्पनांमध्ये कायदेशीर, आर्थिक आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून मोठा फरक आहे.

आज अनेक मालमत्ता वाद, ताब्याचे प्रश्न, कर संबंधित अडचणी, स्टॅम्प ड्युटीचे विवाद आणि न्यायालयीन प्रकरणे केवळ चुकीचा करार निवडल्यामुळे निर्माण होतात. त्यामुळे 'भाडे करार' करणे हा फक्त दस्तऐवज तयार करण्याचा विषय नसून भविष्यातील जोखीम व्यवस्थापनाचा विषय आहे. सर्वात आधी रजा आणि परवाना करार समजून घेणे आवश्यक आहे. हा असा करार आहे ज्यामध्ये मालक (परवानाधारक) दुसऱ्या व्यक्तीस (परवानाधारक) मालमत्तेचा वापर करण्याची मर्यादित परवानगी देतो. येथे मालमत्तेवर कोणताही मालकी हक्क किंवा हितसंबंध निर्माण होत नाही. म्हणजेच, वापरण्याचा अधिकार दिला जातो; परंतु मालकी, नियंत्रण आणि अंतिम अधिकार मालकाकडेच राहतात. यामुळेच महाराष्ट्रात निवासी फ्लॅट, छोटे कार्यालय, दुकाने, सर्व्हिस अपार्टमेंट्स, तात्पुरत्या व्यावसायिक जागा आणि आयटी ऑफिसेससाठी रजा आणि परवाना करार मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. विशेषतः भविष्यात जागा परत मिळविणे तुलनेने सोपे व्हावे, यासाठी अनेक मालक हा पर्याय पसंत करतात.

अनेकांना एक मोठा गैरसमज असतो की, रजा आणि परवाना करार फक्त ११ महिन्यांसाठीच करता येतो. प्रत्यक्षात कायद्यात अशी कोणतीही अट नाही. ११ महिने हा केवळ बाजारातील प्रघात आहे. व्यवहाराच्या गरजेनुसार १ महिना, २ वर्षे, ३ वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधीचे रजा आणि परवाना करार पूर्णपणे वैध असू शकतात. मात्र, कालावधी वाढत जाईल तशी मसुदा तयार करणे अधिक मजबूत असणे आवश्यक ठरते.

दुसरीकडे लीज डीड हा केवळ वापराचा करार नसून तो मालमत्तेतील काही प्रमाणात हितसंबंध (मालमत्तेचे व्याज) निर्माण करू शकतो. लीजमध्ये पट्टेदारला अनेक वेळा अनन्य ताबा मिळतो. यामुळे लीज हे लायसन्सपेक्षा अधिक मजबूत हक्क निर्माण करणारे साधन ठरते. म्हणूनच औद्योगिक युनिट्स, कारखाने, गोडाऊन, हॉस्पिटल्स, शैक्षणिक संस्था, मोठ्या व्यावसायिक जागा किंवा दीर्घकालीन वापरासाठी लीज अधिक प्रचलित आहे.



अनेक वेळा ९ वर्षे, २९ वर्षे, ६० वर्षे किंवा ९९ वर्षांच्या लीजदेखील पाहायला मिळतात.

सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, रजा आणि परवानामध्ये वापरण्याची परवानगी दिली जाते; तर लीजमध्ये काही प्रमाणात ताबा आणि हक्क निर्माण होऊ शकतात. म्हणूनच भविष्यात जागा रिकामी करून घेणे, नूतनीकरणाचे हक्क, हस्तांतरण किंवा सबलेटिंग यासारखे मुद्दे लीजमध्ये अधिक महत्त्वाचे ठरतात.

याठिकाणी 'भाडे करार' या शब्दाबद्दल स्पष्टता आवश्यक आहे. अनेकांना भाडे करार हा स्वतंत्र कायदेशीर प्रकार वाटतो. प्रत्यक्षात भाडे करार हा फक्त सामान्य व्यवहारातील शब्द आहे. अनेक वेळा रजा आणि परवानाला भाडे करार म्हटले जाते. काही ठिकाणी लीजला त्याच नावाने ओळखले जाते. त्यामुळे दस्तऐवजाचे नाव न पाहता त्यातील कलम रचना समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते.नोंदणी हा आणखी एक महत्त्वाचा विषय आहे. अनेक वेळा खर्च वाचवण्यासाठी किंवा घाईत लोक नोंदणी टाळतात. मात्र, भविष्यात वाद निर्माण झाल्यास नोंदणीकृत करार मोठा आधार ठरतो. नोंदणीमुळे कराराचा पुरावा मजबूत होतो, न्यायालयीन प्रक्रियेत मदत मिळते, पोलिस पडताळणी सुलभ होते आणि ताब्याचे प्रश्न सोडविणे तुलनेने सोपे जाते. आजकाल रजा आणि परवाना कराराची ऑनलाईन नोंदणी मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. मसुदा तयार करणे, आधार पडताळणी, बायोमेट्रिक प्रक्रिया आणि नोंदणी ही प्रक्रिया अनेकदा घरबसल्या पूर्ण करता येते. त्यामुळे अनुपालन करणे पूर्वीपेक्षा अधिक सोपे झाले आहे.

भाडे करार करताना कर परिणामदेखील दुर्लक्षित करता येत नाहीत. अनेकांना वाटते की भाडे व्यवहार म्हणजे फक्त मासिक भाडे आणि डिपॉझिट. प्रत्यक्षात घराच्या मालमत्तेच्या उत्पन्नावर आयकर लागू होऊ शकतो, व्यावसायिक मालमत्तावर जीएसटीचे परिणाम येऊ शकतात, काही व्यवहारांमध्ये टीडीएस लागू होऊ शकतो आणि सुरक्षा ठेवचे वेगळे कर परिणाम असू शकतात. विशेषतः कंपन्या, भागीदारी संस्था किंवा मोठे व्यावसायिक व्यवहार करताना अनुपालन आवश्यकता वाढू शकते.

व्यवहारात आणखी एक मोठी चूक म्हणजे इंटरनेटवरील सामान्य स्वरूप वापरणे. प्रत्येक व्यवहार वेगळा असतो. म्हणून मालमत्तेचे वर्णन, अनामत रकमेच्या अटी, लॉक-इन कालावधी, वाढीव दराचे कलम, सूचना कालावधी, समाप्तीचे अधिकार, देखभालीची जबाबदारी, सुविधा, नूतनीकरणाच्या अटी आणि डिफॉल्ट क्लॉजेस यांसारख्या तरतुदी काळजीपूर्वक मसुदा करणे अत्यंत आवश्यक आहे. समजा एखादा व्यक्ती ११ महिन्यांसाठी निवासी फ्लॅट देत असेल तर रजा आणि परवाना हा पर्याय योग्य ठरू शकतो.

परंतु जर एखादे गोदाम १५ वर्षांसाठी वापरासाठी देत असेल तर लीज अधिक योग्य ठरू शकते. त्याचप्रमाणे हॉस्पिटल, शाळा किंवा उद्योगासाठी दीर्घकालीन जागा देताना लीज स्ट्रक्चर अधिक सुरक्षित मानली जाते. शेवटी, भाडे करार हा केवळ भाडे ठरविणारा दस्तऐवज नसून भविष्यातील आर्थिक, कायदेशीर श मालमत्तासंबंधित जोखमींपासून संरक्षण देणारी व्यवस्था आहे. रजा-परवाना आणि लीज यातील फरक समजून घेतल्यास भविष्यातील वाद, आर्थिक नुकसान आणि अनावश्यक न्यायालयीन प्रक्रिया मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतात. योग्य मसुदा तयार करणे, योग्य नोंदणी आणि व्यवहाराला अनुरूप योग्य करार हाच सुरक्षित व्यवहाराचा पाया आहे.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# ग्रेट ग्रीन वॉल अन् डेथ वॉरंट!

उन्हाळा सपाटून तापतो, पाऊस बेसुमार पडतो, हिवाळा झाला तर असह्य नाही तर तसाच निघून जातो! पाऊस मात्र आता बाराही महिने अधूनमधून पडत असतो. एकंदरीत हे सारं का होतं आहे, याचं भाषण आज ५ जून या पर्यावरण दिनापासून आपणा सर्वांना ऐकायचं आहे. आपण जे पर्यावरणाला ओरबाडतो त्याचे पाप 'याचि जन्मी याची डोळा' बघतो आहोत, अनुभवतोही आहोत. आज पर्यावरण दिन. रोहिणी नक्षत्र सुरू आहे अन् चार दिवसांनी मृग नक्षत्र लागणार आहे. रोहिणीत तुरळक पाऊस येतो आणि मृगात बरसतो. पण, सद्यस्थिती पार बदलली आहे. मृगात आला तर आला, नाही तर पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहण्याशिवाय पर्याय नसतो. एखाद वेळी मृगात बरसतो, शेतकरी पेरणी करतो; पण पाऊस गायब होतो आणि दुबार-तिबार पेरणीची वेळ येते. पुढे शेतकरी आत्महत्या वगैरे वगैरे... पण, या सर्व गोष्टीला कारणीभूत कोण ठरते आहे तर सर्वज्ञानी असलेला मनुष्य! ओरबाडण्यातून आता कोणतेही क्षेत्र सुटले नाही. सर्व ओरबाडून झालेले आहे. त्याचे प्रत्यक्ष आणि भयंकर दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. पण, त्यातून काही बोध घेईल तो मनुष्य कसला? आता हेच बघा नं, आपल्या सह्याद्री पर्वत रांगांप्रमाणे अरावली पर्वतरांग आहे. भारतातील सर्वात प्राचीन पर्वतरांग म्हणून तिची ओळख आहे. तिचा विस्तार प्रामुख्याने उत्तर-पश्चिम भारतात ७०० किलोमीटरपर्यंत आहे. अरावलीतील सर्वात उंच शिखर 'गुरुशिखर' माऊंट अबू येथे असून त्याची उंची १ हजार ७२२ मीटर म्हणजे ५ हजार ६५० आहे. ही पर्वतरांग राजस्थानातील वाळवंटाचा विस्तार पूर्वेकडे होण्यापासून थांबवण्यास मदत करतात आणि उत्तर भारताच्या पर्यावरणीय संतुलनात महत्त्वाची भूमिका बजावतात. राजस्थानपासून दिल्ली आणि पुढे गुजरातपर्यंत पसरलेली ही पर्वतरांग उत्तर भारताच्या हवामान, पर्यावरण आणि जीवन व्यवस्थेचा एक भाग आहे. अरावली पर्वतरांग आधी कुरतडली जात होती. हळूहळू ती पोखरली गेली आणि आता ती शेवटच्या घटका मोजण्यात आली असताना जनआंदोलन उभे झाले. न्यायालयानेही या पर्वतरांगांविषयी चिंता व्यक्त केली, सरकारला जाब विचारला! ती पर्वतरांग पर्यावरणाच्या दृष्टीने विचार केल्यास दिल्लीची ढाल आहे. तज्ज्ञांच्या मते या पर्वत रांगेमुळे राजस्थानातील अनेक भाग पूर्णपणे वाळवंट होण्यापासून रोखतात. या टेकड्या मान्सूनच्या वाऱ्याचा वेग कमी करतात. त्यामुळे पाऊस पडतो. आपण आता अनुभवत असलेले कडक उन्ह, रात्रीचे उष्ण वारे, दिल्लीकडे आलेले वाळूचे वादळ यासोबतही या पर्वतरांगांचा संबंध आहे. ही पर्वतरांग थारच्या वाळवंटातून येणारी धूळ आणि उष्णवारे दिल्लीकडच्या भागात येण्यासाठी थांबवते. जैववैविधतेचे रक्षण करते. येथे विविध औषधी वनस्पती आढळून येतात. एकंदरीत नैसर्गिकदृष्ट्या संपन्न या पर्वतरांगा आता नेस्तनाबूत होण्याच्या मार्गावर आल्या आहेत. अवैध वृक्षतोड अरावलीत होते आहे. काही भागात बेकायदेशीर खाणकाम व बांधकाम होते आहे. या पर्वतरांगेतून खनिज संपत्तीचे 'दोहन' सुरू असल्याने त्या पर्वतरांगा छोट्या छोट्या होत चालल्या आहेत. ऑक्टोबर २०२५ च्या अहवालानुसार राजस्थानातील १२ हजार ८१ टेकड्यांपैकी १ हजार ४२ टेकड्या (अर्थात पर्वत) १०० मीटरच्या मानांकनाला पूर्ण करते आहे. त्यामुळे न्यायालयाने चिंता व्यक्त करीत समितीची स्थापना करण्याची सूचना केली. ३१ ऑगस्ट २०२५ मध्ये त्या समितीला आपला अहवाल सादर करावा लागणार आहे. ज्या अरावली पर्वत रांगेने दिल्ली आणि उत्तर भारताचे रेतीच्या वादळापासून संरक्षण केले, तीच आता स्वतःच्या अस्तित्वासाठी धडपडत आहे. ही अरावली पर्वतरांग वाचवण्यासाठी समाजमाध्यमांवर जनआंदोलन सुरू आहे. न्यायालयातही दाद मागितली जात आहे. आंतरराष्ट्रीय वाळू कलाकार अजय रावत यांनी वाळू कलाकृतीतून अरावली पर्वतरांगेचे जनत करण्याचा संदेश दिला आहे. विदर्भात उन्हाचा पारा पुढील वर्षी ५० अंशाच्या घरात जाण्याची घंटी यावर्षी ४७.८ अंश सेल्सिअस तापमानाने वाजवली आहे. पुढील वर्षी ते अर्धे शतक पूर्ण केल्याशिवाय राहणार नाही. पर्यावरण दिनापासून पुढील काही महिने वृक्षारोपणाची चळवळ सुरू राहणार आहे. शासन, प्रशासन, सामाजिक संघटनाही सक्रिय सहभाग घेतील. फोटो काढतील, वृत्तपत्रांना फोटो आणि बातम्याही देतील. पण, लावलेली झाडं जगवण्याची जबाबदारी कोणी घेणार आहे का? बेसुमार पाऊस सहन करता येईल. हिवाळ्यात गरम कपडे घालून हिवाळ्याचा आनंद लुटता येईल. पण, उन्हाचे चटके सहन करणे शक्य नाही. ते शेकवल्याशिवाय राहत नाही. अरावली पर्वत रांगेला 'ग्रेट ग्रीन वॉल' म्हटले जाते. या ग्रेट ग्रीन वॉलला धक्का लागल्याने तिचा आता 'डेथ वॉरंट' निघाला आहे. प्रगतीच्या महामार्गावर धावताना आपण आपल्याच विनाशाचा मार्ग प्रशस्त करतो आहोत. त्या मार्गावर आता हिरवळ निर्माण करत स्वतःच्या मतलबासाठी किमान पर्यावरण शाबूत राखण्याची जबाबदारी आपण स्वीकारू या!

९८८१९०३७६५

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# संतुलित आणि दूरदर्शी करार

भारत-न्यूझीलंड मुक्त व्यापार करार (एफटीए) याकडे केवळ आयात-निर्यात सुलभ करणारा करार म्हणून पाहणे हे त्याचे महत्त्व कमी करून पाहणे ठरेल. हा करार प्रत्यक्षात भारताच्या आर्थिक विचारसरणीत झालेल्या बदलाचा तसेच जागतिक अर्थव्यवस्थेत आपले स्थान नव्याने निश्चित करण्याच्या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. विशेष म्हणजे, हा करार 'संतुलित आणि दूरदर्शी' आहे. कारण तो केवळ आजच्या व्यापाराला चालना देत नाही, तर भविष्यातील आर्थिक, तांत्रिक आणि मानवी संसाधनांच्या गरजांनाही ओळखतो. भारताने दीर्घकाळ स्वतःच्या बाजारपेठेचे संरक्षण करण्यावर भर दिला. त्यामागे ऐतिहासिक आणि सामाजिक कारणे होती. कृषिप्रधान अर्थव्यवस्था, मोठ्या प्रमाणावर असंघटित क्षेत्र आणि रोजगाराचे स्वरूप लक्षात घेतले, तर संरक्षणवाद हा काही अंशी अपरिहार्य होता; मात्र जागतिकीकरणाच्या नव्या टप्प्यात हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक होते. भारत-न्यूझीलंड 'एफटीए' हा त्या बदलाचा परिपक्व आविष्कार आहे. या करारातून भारताने एक स्पष्ट संदेश दिला आहे, तो म्हणजे भारत आता जगाशी स्पर्धा करण्यास तयार आहे; पण आपल्या मूलभूत हितांचे संरक्षण करत. या कराराचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील 'कॅलिब्रेटेड ओपनिंग' म्हणजेच नियंत्रित उदारीकरण. भारताने सर्व क्षेत्रे एकदम खुली न करता, टप्प्याटप्प्याने आणि निवडक क्षेत्रांमध्येच बाजार उघडला आहे. कृषी क्षेत्रातील संवेदनशील उत्पादने, जसे की दुग्ध व्यवसाय, डाळी, साखर यांना संरक्षण दिले आहे. हे केवळ आर्थिक निर्णय नाही तर सामाजिक स्थैर्य राखण्याचा प्रयत्न आहे.

भारताने ज्या क्षेत्रांमध्ये आपली ताकद आहे, त्या क्षेत्रांसाठी दारे मोठ्या प्रमाणावर उघडून घेतली आहेत. वस्त्र-परिधान, औषधनिर्माण, अभियांत्रिकी, सेवा क्षेत्र या सर्व क्षेत्रांना न्यूझीलंडच्या बाजारात अधिक संधी मिळणार आहेत. भारताची अर्थव्यवस्था हळूहळू उत्पादन आणि सेवांच्या निर्यातीवर आधारित होत आहे. न्यूझीलंडने भारतात २० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले आहे. हे आश्वासन केवळ आकड्यांपुरते मर्यादित नसून त्यामागे पायाभूत सुविधा, हरित ऊर्जा आणि उत्पादन क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविण्याचा व्यापक हेतू आहे. भारतासाठी ही गुंतवणूक अत्यंत महत्त्वाची आहे. मानवी संसाधनांच्या दृष्टीने पाहिले, तर हा करार एक नवा आदर्श निर्माण करतो. बहुतेक 'एफटीए'मध्ये वस्तू आणि सेवांवर भर दिला जातो; परंतु या करारात व्यक्तींच्या हालचालींनाही महत्त्व दिले गेले आहे. भारतीय विद्यार्थ्यांसाठी आणि व्यावसायिकांसाठी 'व्हिसा' सुलभता ही त्याची मोठी जमेची बाजू आहे. आजच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत मानवी भांडवल ही सर्वात मोठी ताकद आहे. त्यामुळे अशा प्रकारचे प्रावधान भविष्यातील व्यापार करारांसाठी एक नवीन दिशा ठरू शकते. या पृष्ठभूमीवर न्यूझीलंडसोबतचा करार हा केवळ द्विपक्षीय नाही, तर व्यापक प्रादेशिक रणनीतीचा भाग आहे.



तथापि, या कराराच्या यशासाठी काही आव्हानेही आहेत. सर्वप्रथम, भारतीय उद्योगांनी जागतिक दर्जाची गुणवत्ता आणि कार्यक्षमता साध्य करणे आवश्यक आहे. शुल्कमुक्त प्रवेश मिळाल्याने स्पर्धा वाढेल आणि त्यात टिकण्यासाठी नवकल्पना, संशोधन आणि विकास यावर अधिक भर द्यावा लागेल. दुसरे म्हणजे, सरकारने धोरणात्मक स्थैर्य आणि सुसंगतता राखणे आवश्यक आहे. वारंवार बदलणारी धोरणे गुंतवणूकदारांचा विश्वास कमी करू शकतात. तिसरे म्हणजे, या कराराचे फायदे सर्व स्तरांपर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे आहे. केवळ मोठ्या उद्योगांना नव्हे, तर लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) या संधींचा लाभ मिळायला हवा. यासाठी वित्तीय सहाय्य, तांत्रिक प्रशिक्षण आणि बाजारपेठेची माहिती उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. अन्यथा, उदारीकरणाचा फायदा काही मोजक्या घटकांपुरताच मर्यादित राहण्याचा धोका आहे.

भारत-न्यूझीलंड 'एफटीए' हा एक असा करार आहे, जो भारताच्या नव्या आर्थिक युगाचे प्रतीक आहे. तो दाखवतो की, भारत आता केवळ स्वतःच्या बाजारपेठेचे रक्षण करणारा देश राहिलेला नाही, तर तो जागतिक अर्थव्यवस्थेत सक्रिय आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका बजावू इच्छितो; मात्र हा आत्मविश्वास आंधळा नाही, तर तो वास्तववादी आणि संतुलित आहे. या संधीचे यशस्वी रूपांतर करण्यासाठी आवश्यक ते धोरणात्मक निर्णय, सुधारणा आणि अंमलबजावणी यांची जोड देणे तितकेच आवश्यक आहे. भारताच्या आर्थिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. या कराराचा दुसरा महत्त्वाचा स्तंभ म्हणजे गुंतवणूक. न्यूझीलंडने पुढील १५ वर्षांत भारतात २० अब्ज डॉलर्स गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. ही गुंतवणूक प्रामुख्याने पायाभूत सुविधा, उत्पादन क्षेत्र आणि नवीकरणीय ऊर्जा यामध्ये होणार आहे. भारतासाठी ही मोठी संधी आहे. कारण या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवल, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन कौशल्याची गरज आहे. परकीय गुंतवणुकीमुळे रोजगारनिर्मिती, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि उत्पादन क्षमता वाढीस मदत होईल. यात एक महत्त्वाची तरतूद म्हणजे 'रीबॅलन्सिंग क्लॉज.' ठरवलेली गुंतवणूक प्रत्यक्षात आली नाही, तर भारताला सुधारात्मक उपाययोजना करण्याचा अधिकार असेल. ही तरतूद भारताच्या हितसुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. अनेकदा मोठ्या गुंतवणुकीच्या घोषणा केल्या जातात; पण प्रत्यक्षात त्या पूर्ण होत नाहीत. या पृष्ठभूमीवर हा संरक्षणात्मक उपाय योग्य म्हणावा लागेल. मानवी संसाधनांच्या दृष्टीनेही हा करार अत्यंत लाभदायक आहे. भारतीय विद्यार्थ्यांसाठी न्यूझीलंडने व्हिसा मर्यादा काढून टाकली आहे. शिक्षण घेताना आठवड्याला २० तास काम करण्याची आणि शिक्षणानंतर चार वर्षांपर्यंत राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. हे पाऊल भारतीय तरुणांसाठी मोठी संधी निर्माण करणारे आहे. परदेशी शिक्षण, कामाचा अनुभव आणि जागतिक दृष्टिकोन या तिन्ही गोष्टी एकत्र मिळण्याची शक्यता यामुळे वाढेल. तसेच आयटी, आरोग्यसेवा आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी पाच हजार विशेष व्हिसांची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय योग प्रशिक्षक, आयुष चिकित्सक, भारतीय शेफ आणि संगीत शिक्षक यांसारख्या विशिष्ट क्षेत्रांनाही संधी दिली आहे. यामुळे केवळ आर्थिक नव्हे, तर सांस्कृतिक देवाणघेवाणही वाढेल. 'पीपल-टू-पीपल' आणि 'बिझनेस-टू-बिझनेस' संबंध अधिक मजबूत होतील. रणनीतिक दृष्टिकोनातून पाहिले तर, न्यूझीलंड हा भारतासाठी ओशियानिया आणि प्रशांत प्रदेशातील प्रवेशद्वार ठरू शकतो. या भागात भारताची उपस्थिती अद्याप मर्यादित आहे. या करारामुळे त्या प्रदेशात भारताची आर्थिक आणि राजनैतिक उपस्थिती वाढेल. जागतिक पुरवठा साखळ्यांमध्ये भारताचे स्थान अधिक बळकट होईल.


(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

### वसुलीत भेदभाव नको

'लाडकी बहीण झालेले पुरुष अडकणार' ही बातमी वाचली. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे. ...तुम्ही सर्व लोकांना, सर्वकाळ समाधानी ठेवू शकत नाही! जनतेला काहीही कष्ट न करता विनाश्रम, घरपोच पैसा पुरवणाऱ्या लाडकी बहीणसारख्या तत्सम सरकारी योजना राज्याला आर्थिक दिवाळखोरीकडे नेणाऱ्या आहेत, हे पाचवीत शिकणारा विद्यार्थीही सांगू शकतो. त्यातही सरकारी योजनांचा गैरफायदा घेण्यासाठी लागणारी अफाट बुद्धी परमेश्वराने माणसाला दिली आहे; यात महिलाही मागे नाहीत. दुसरे म्हणजे महिलांना अधिकार, हक्क देताना सरसकट सगळे पुरुष म्हणजे नरपशू आणि सरसकट सगळ्या महिला म्हणजे गाई, असा अजब समज समाजात दृढ होताना दिसतो आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही फुकटचा फायदा देणाऱ्या योजना सुरू करण्यापूर्वी, पात्र लोकांनाच त्या योजनेचा लाभ होईल याची खात्री करणे, हे सरकारचे कर्तव्य होते. आता अपात्र पुरुषांकडून वसुली करताना, अपात्र महिलांकडून वसुली होईल का?

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### उदासीनता टाळा, झाडे लावा, पर्यावरण वाचवा!



ती बोलत नाही. तक्रार करत नाही. आपण तिची झाडं तोडतो, नद्या घाण करतो, डोंगर पोखरतो... तरीही ती पोटाला धान्य देते, श्वासाला हवा देते. ती आहे आपली निसर्ग देवता. राजा रविवर्मांनी रंगवावी अशी शालिन, करुणामय भारतीय माता. लहानपणी मी आजीच्या अंगणातल्या भल्यामोठ्या आंब्याच्या झाडाखाली बसून अभ्यास करायचो. उन्हाळ्यातही त्या झाडाची भरपूर सावली थंडगार वाटायची. त्या झाडाला पाहून मन आनंदाने भरून यायचं. आज ते झाड नाही.

## वाचक पत्रे

रस्ता रुंदीकरणात भुईसपाट झालं. तेव्हा कळलं, झाड गेल्यावर सावली फक्त आठवणीत उरते. आज तिचा पदर ओढला जातोय. एसीची थंड हवा हवीय, पण झाडाची सावली नकोय. प्लॅस्टिकची पिशवी सहज फेकतोय, पण एक रोप लावायला वेळ नाही. हीच आपली उदासीनता आहे. भविष्य घडवायचं असेल तर भान ठेवावं लागेल. पर्यावरण दिन म्हणजे फक्त ५ जूनचा सेल्फी नाही. 'झाड लावलं' स्टेटस ठेवून झालं असं नाही. निसर्ग संवर्धन म्हणजे रोजची सवय पाहिजे. पिशवीऐवजी कापडी पिशवी, कचराऐवजी कंपोस्ट प्रत्येकाने आपल्या परीने भार उचलला पाहिजे. मराठीत एक म्हण आहे, 'झाड लावणारा सावलीसाठी नाही, तर पुढच्या पिढीसाठी जगतो.' खरंय. आपण लावलेलं झाड आपल्याला सावली देणार नाही कदाचित, पण आपल्या मुलाला नक्की देईल. म्हणून आज संकल्प करूया. उदासीनता टाळूया आणि झाड लावूया.

**दीपक जोशी**/अकोला, ९४२३१५०५५०

### रोजगार निर्मितीला प्राधान्य द्या

गेल्या काही वर्षांत देशातील बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही तरुणांच्या हाताला काम नाही. तरुणांमध्ये नैराश्य पसरले आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत, तोच तरुण जर रोजगार नसल्याने नैराश्याच्या गर्तेत अडकला तर ती देशासाठी मोठी धोक्याची घंटा असेल. या तरुणांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत.

नवे रोजगार निर्माण करण्यासाठी सरकारने लवकरात लवकर उपाययोजना करायला हव्यात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार जगातील सर्वाधिक तरुण भारतात राहत आहेत. देशातील ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे त्यातही जेन झीची संख्या अधिक आहे. त्यांच्यात प्रचंड ऊर्जा आहे. काम करण्याची धमक आहे. या तरुणांच्या हाताला रोजगार मिळाला तर त्यांच्या मेहनतीचा आणि गुणवत्तेचा उपयोग राष्ट्र उभारणीच्या कार्यात होईल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### वाचनीय अग्रलेखातून झणझणीत ताशेरे

'मानवी जीव आणि हप्तेखोरी' हा दैनिक तरुण भारतात प्रकाशित झालेला अग्रलेख वाचला. अग्रलेखातून आपण झणझणीत ताशेरे ओढले आहेत. अभ्यासपूर्ण, चिंतनशील अग्रलेख खरोखरच मनाला स्पर्श करून गेला. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्याचे तीन-तेरा उडाले आहेत. पोलिस यंत्रणा, राजकीय-सामाजिक पदाधिकारी पडद्याआडून अशा लोकांना मदत करीत असतात. म्हणूनच असे अवैध धंदे त्यांच्या आशीर्वादाने राजरोस चालू आहेत. आपण कितीही कायदे कठोर केले तरी काही दिवसांत पुन्हा हप्तेबाजी सुरू होऊन निर्जन ठिकाणी दारूभट्ट्या सुरू होतील. याला कुठेतरी आळा घातला पाहिजे.

**डॉ. राहुल भोसले**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जलनायक मयांक गांधी यांच्या 25 लक्ष वृक्ष लागवडीच्या मोहिमेत नागरिकांनी सहभाग घ्यावा

## सामाजिक कार्यकर्ते चेतन सौंदळे यांचे आवाहन



**परळी वैजनाथ :** ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष तथा जलनायक मयांक गांधी यांच्या पुढाकारातून दि.23 जुलै ते 29 जुलै दरम्यान परळी तालुक्यात 25 लक्ष वृक्ष लागवड करण्याचा ऐतिहासिक संकल्प करण्यात आला असून या वृक्ष लागवड व संवर्धन मोहिमेत सर्व नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग घेण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते चेतन सौंदळे यांनी 5 जुन 'जागतिक पर्यावरण' दिनाच्या औचित्यावर केले आहे.

मोठया प्रमाणात होत असलेली वृक्षतोड तसेच प्रदूषणामुळे जागतिक तापमान वाढ होत असून त्यामुळे दरवर्षी वाढत्या तीव्र उष्णतेचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. परळी व परीसरातील वाढते तापमान व प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी प्राणवायू निर्मिती करणा-या वृक्षांची लागवड व संवर्धन आवश्यक आहे. हरित परळी,सुंदर परळी परीसर करण्यासाठी सतत प्रयत्न करत राहणे आवश्यक आहे. आपल्या सभोवताली आपण झाडे लावणे काळाची गरज झाली आहे.आपल्या शहराचे तसेच परीसराचे वैभव वाढवायचे असेल तर सर्व स्तरावर प्रामाणिक प्रयत्न आवश्यक आहेत त्याकरिता वृक्ष लागवड संवर्धन समिती तसेच विविध सामाजिक संस्था,शाळा-महाविद्यालये,वृक्षप्रेमी तसेच नागरिकांच्या उपस्थित ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष श्री. मयांक गांधी यांच्या प्रमुख उपस्थित बैठक व नियोजनाची रूपरेषा ठरविण्यात येणार असून सदरील वृक्ष लागवड मोहिमेत सहभागी होवून वृक्षांचे संवर्धन करण्याचे आवाहन चेतन सौंदळे यांनी केले आहे.

# राष्ट्रीय अनुसूचित जाती जनजाती विकास परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी डॉ.प्रकाश शिंदे यांची निवड



**माजलगाव प्रतिनिधी :** राष्ट्रीय अनुसूचित जाती जनजाती विकास परिषदेच्या जिल्हाध्यक्ष पदावर डॉ.प्रकाश शिंदे यांची नियुक्ती झाली आहे.हि नियुक्ती परिषदेच्या वरिष्ठ स्तरीय निर्णयानुसार झाली आहे.

डॉ.प्रकाश शिंदे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून व त्यांच्या विचारला अनुसरून सामाजिक कार्यात अनुसूचित जाती जनजाती समाजाच्या उन्नतीसाठी विविध स्तरावर सक्रिय राहिले आहेत. महाराष्ट्रातील एस.सी एस.टी समाजाच्या उद्योजकता विकास व आर्थिक सक्षमीकरणासाठी ते विशेष प्रयत्न करणार असुन केंद्रीय स्तरावरील व राज्य स्तरावरील शासनाच्या विविध विकास योजनांच्या माध्यमातून अनु. जाती जणजाती समूहाला उदयोग व्यवसायात नवीन संधी निर्माण करून देऊन त्यांना आर्थिक सक्षम करून त्यांच्या उन्नती साठी सतत प्रयत्नशील राहणार.तसेच अनु.जाती जनजातीच्या कुठल्याही व्यक्तीस त्यांच्या न्याय हक्का पासून कोणीही वंचित ठेवणार नाही यासाठी हि प्रयत्नशील राहू. असे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय अध्यक्ष प्रवीण मंगरिया,केंद्रीय मंत्री.ना.ज्यूएल युरावं (अनुसुचिय जाती जनजाती मंत्रालय,नवी दिल्ली) माजी केंद्रीय मंत्री. फगन सिंग, माजी केंद्रीय मंत्री.मुकुलजी वासनिक ,खासदार.प्रणिती शिंदे,राष्ट्रीय संघटन प्रभारी पी.सी.बेरवाल,राष्ट्रीय महासचिव डॉ.देवराव होळी,राज्याध्यक्ष रवी सोमकुवर,महाराष्ट्र प्रदेश सचिव. डॉ.नरेंद्रजी उंदिरवाडे, महिला मोर्चा राज्य महामंत्री ॲड.कविता मोहरकर यांनी शिंदे यांची नियुक्ती करून पुढील कार्याला शुभेच्छा दिल्या आहेत. आहे.

# बीड येथे पहिले कर्मचारी समाधान शिबीर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनात संपन्न

**बीड ,दि.५(जिमाका):** शासकीय सेवेतील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी आता तातडीने मार्गी लागणार आहेत. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी कर्मचारी समाधान शिबीर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तरी बीड येथे पहिले कर्मचारी समाधान शिबीर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडले.

जून महिन्यातील पहिल्या जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन शुक्रवार, दि. ५जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात करण्यात आले. यावेळी प्र.निवासी उपजिल्हाधिकारी श्री. सोनी, उपजिल्हाधिकारी कैलास सूर्यवंशी, तहसीलदार श्री.मेंडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

बीड जिल्ह्यातील सर्व संबंधित अधिकारी- कर्मचारी आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी या शिबिरास उपस्थित राहून आपल्या सेवाविषयक समस्या अर्जाद्वारे सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून यावेळी करण्यात आले. अनेकदा शासकीय कर्मचाऱ्यांना वेतन, पदोन्नती, रजा, निवृत्तीवेतन किंवा सेवापुस्तिका अद्यावत करणे यासारख्या वैयक्तिक व सेवाविषयक कामांसाठी प्रशासकीय कार्यालयात वारंवार जावे लागते. कर्मचाऱ्यांची ही ससेहोलपट थांबविण्यासाठी प्रशासनाने हे अत्यंत महत्त्वाचा पाऊल उचलले आहे. कर्मचारी समाधान शिबीरामुळे कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण होऊन प्रशासकीय कामाला मोठी गती मिळणार आहे. जर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी शासकीय सुट्टी आली, तर त्यापूर्वीच्या कामकाजाच्या दिवशी हे शिबीर घेतले जाणार आहे. सर्व संबंधित विभाग प्रमुखांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश देण्यात आले असून, कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर थेट जबाबदारी निश्चित केली जाणार आहे.

# महंत विठ्ठल महाराज यांच्या उपस्थितीत गहिनीनाथ गडावर वृक्षारोपण; 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाला प्रतिसाद

## पंतप्रधान नरेंद्र मोदी व लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या आवाहनाला प्रतिसाद

**पाटोदा, दि. ५ जून :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणादायी 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमाला व लोकनेते नामदार पंकजाताई मुंडे यांनी गोपीनाथ गडावर केलेल्या आव्हानाला प्रतिसाद देत तसेच पंतप्रधानांच्या यशस्वी बारा वर्षांच्या लोककल्याणकारी कार्यकाळानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने बीड जिल्हाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून क्षेत्र गहिनीनाथ गड, ता. पाटोदा येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.



प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणजी लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे मा.खा. प्रीतम ताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात महंत विठ्ठल महाराज यांच्या शुभहस्ते भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत सुमारे ५० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी अनुसूचित मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. वाल्मिक निकाळजे, माजी पंचायत समिती सभापती काकासाहेब लांबरुड, जिल्हा उपाध्यक्ष लालासाहेब कुमकर, मधुकर अनारसे, संदीप नागरगोजे, संतोष माळशिखरे, सरपंच मारुती सांगळे, सरपंच तात्या लाड प्रा. भरत गर्जे यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते, भाविक व पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी महंत विठ्ठल महाराज यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच भारतीय जनता पार्टीच्या वतीने जिल्ह्यातील प्रत्येक बूथवर किमान पाच वृक्ष लावण्याचा संकल्प राबविण्यात आला असून जिल्हाभर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले असल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यावर मात करण्यासाठी वृक्षारोपण हा सर्वात प्रभावी उपाय असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित नसून मातृप्रेम, संस्कार आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर संगम आहे. आईप्रती कृतज्ञता व्यक्त करताना पृथ्वीमातेचे रक्षण करण्याचा संदेश या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या बारा वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त आगामी काळात बीड जिल्ह्यात विविध जनजागृती, सेवा आणि विकासाभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

"आज लावलेले एक झाड उद्याच्या पिढीचे जीवन वाचवू शकते. झाडे लावा, झाडे जगवा आणि पर्यावरण वाचवा," असा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.

# परळीत 26 किलो गांजासह पावणेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त, आरोपी अटकेत

**परळी वैद्यनाथ :** स्थानिक गुन्हे शाखेने परळीमध्ये अंमली पदार्थांच्या विरोधात एक मोठी आणि धडक कारवाई केली आहे. परळी येथील रामनगर भागात एका घरावर छापा टाकून पोलिसांनी तब्बल २६ किलो २५८ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. या कारवाईत एकूण ७ लाख ८७ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.



**मंगळवारी (दि. २ जून) दुपारी ४:३०** वाजेच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने परळीतील रामनगर भागात राहणारा संशयित राहुल राजू मोहिते (वय २६ वर्षे) याच्या घरावर अचानक छापा टाकला. या छाप्यात पोलिसांना घरात लपवून ठेवलेला २६ किलो २५८ ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजासह एकूण ७ लाख ८७ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपी राहुल मोहिते याच्याविरुद्ध परळी पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई बीड एलसीबीचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वाखालील पोलिस निरीक्षक रघुनाथ नाचन, उपनिरीक्षक दीपक राठोड, सफौ बालाजी दराडे, अंमलदार रामचंद्र केकान, गोविंद भताने, सचिन आंधळे, प्रल्हाद भताने, पुरुषोत्तम काळे, शीतल घुगे, पंडित पांचाळ, कैलास कोलमवाड, शुभम घुले आणि महिला पोलीस अंमलदार भोसले आदींनी केली.

# पिंपळनेर पोलिस ठाण्याचा सपोनी विजय नरवडे यांनी पदभार स्वीकारला



**बीड :** बीड जिल्ह्यातील अनेक पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून बीड तालुक्यातील पिंपळनेर पोलिस ठाणे येथील तात्कालीन सपोनी मधुसुदन घुगे यांची अंबाजोगाई येथील पिंकपथकात बदली झाली असुन त्याच्या जागी आष्टी येथील सपोनी विजय नरवडे यांची बदली झाली आहे नरवडे यांनी नुकताच पदभार स्वीकारला असुन पिंपळनेर पोलिस ठाणे परीसरातील अवैध धंदयाकडे सपोनी नरवडे लक्ष देतील काय या बदल अधिक माहिती अशी की बीड जिल्ह्यातील पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या पोलिस अधिक्षक नवनित कावत यांनी नुकताच केल्या आहेत बीड तालुक्यातील पिंपळनेर पोलिस ठाण्याचे सपोनी मधुसुदन घुगे यांची अंबाजोगाई येथील पिंकपथकात बदली झाली आहे त्याच्या जागी आष्टी येथील सपोनी विजय नरवडे यांची बदली झाली असुन त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे पिंपळनेर पोलिस ठाण्यात डोगरपटयातील कुंडलिका नदि परीसरातील बोरफडी हिवरापहाडी पासुन सिंदफना नदि परीसरातील कुकडगाव भाटसागवी नाथापुर रंजेगाव चा परीसर आहे या परीसरात चालणारे आवैधय धंदे वाळू मटका भिंगरी तिरटपततेखेळणे अवैध दारु विक्री चंदनाची चैरटि तस्करी गुटखा विक्री इत्यादि अवैध्य धंदे नरवडे साहेबांचा काळात बंद होणार का या कडे या परीसरातील सुजान नागरीकांचे लक्ष लागले आहे

# शिंदी दारू विक्रेत्यांवर अंबाजोगाई पोलिसांची धडक कारवाई

## ११० लिटर शिंदी दारूसह दुचाकी जप्त; दोघे ताब्यात

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरातील हत्तीखाना परिसरात अवैधरित्या शिंदी दारूची विक्री करणाऱ्यांवर अंबाजोगाई पोलिसांनी शुक्रवारी (दि. ५ जून) धडक कारवाई करत ११० लिटर शिंदी दारूसह दुचाकी जप्त केली. या कारवाईत दोघांना ताब्यात घेण्यात आले असून एकूण सुमारे ९५ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार

हत्तीखाना परिसरात अवैध शिंदी दारूची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. यावेळी महबूब चंदू बेनिवाले (वय ४७, रा. गवळीपुरा, अंबाजोगाई) आणि अफरोज शफिक बागवान (वय ३८, रा. रविवार पेठ, अंबाजोगाई) यांना ताब्यात घेण्यात आले. कारवाईदरम्यान आरोपींकडून ११० लिटर शिंदी दारू किंमत अंदाजे १० हजार ४०० रुपये तसेच ८५ हजार रुपये किमतीची मोटारसायकल जप्त करण्यात आली. पोलिसांनी जप्त केलेला एकूण मुद्देमाल सुमारे ९५ हजार ४०० रुपयांचा असल्याचे सांगितले.



अंबाजोगाई पोलिसांनी शहर व परिसरात अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम सुरू केली असून दारू, मटका, गुटखा आणि जुगार अड्ड्यांवर सातत्याने कारवाई केली जात आहे. अवैध शिंदी दारूची विक्री करणाऱ्यांवरही आता विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून अशा कारवाया यापुढेही सुरू राहण असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक भागवत कांदे, पोलीस हवालदार भागवत नागरगोजे, पोलीस अंमलदार रवीकुमार केंद्रे, बाळासाहेब पारवे व त्यांच्या पथकाने केली.

अवैध धंद्यांविरोधातील या कारवाईमुळे परिसरातील दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून पोलिसांच्या मोहिमेचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

# तलाठ्याच्या आत्महत्येप्रकरणी पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल

**अंबाजोगाई :** लग्न होऊन अवघे १२ दिवस झाले असतानाच, पत्नीच्या असलेल्या प्रेमसंबंधांमुळे आणि जाचाला कंटाळून गणेश दत्तू कोळी (वय २६) या तलाठी तरुणाने राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना अंबाजोगाई शहरालगतच्या मोरेवाडी परिसरात समोर आली होती. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात मृत तरुणाची पत्नी दिपाली हिच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेशची आई सुनंदा दत्तू कोळी (रा. नांदूर्गा, ता. औसा, जि. लातूर) यांनी या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, त्यांचा मुलगा गणेश हा २०२१ मध्ये राज्य राखीव पोलीस बलात पोलीस शिपाई म्हणून भरती झाला होता. त्यानंतर त्याने तलाठी परीक्षेचा अभ्यास करून २०२४ मध्ये चंद्रपूर येथे तलाठी म्हणून नियुक्ती मिळवली होती. मार्च २०२६ मध्ये त्याचा विवाह बीड येथील दीपाली धनंजय कोळी हिच्याशी निश्चित झाला आणि १३ मे रोजी त्यांचा विवाह मोठ्या उत्साहात पार पडला. दीपाली ही अंबाजोगाई येथील फॉरेन्सिक विभागात कार्यरत आहे. लग्नानंतर कुलदैवताच्या दर्शनाला गेले असताना दीपालीचे वागणे संशयास्पद वाटू लागले. ती कोणाशी तरी लपून फोनवर बोलत असे. त्यानंतर घरात सत्यनारायणाची पूजा झाली, मात्र दिपालीचे वागणे बदलले होते. तिने हे लग्न आपल्या मर्जीविरुद्ध झाल्याचे सांगत गणेशसोबत राहण्यास नकार दिला आणि ती अंबाजोगाईला निघून गेली. गणेश २४ मे रोजी दिपालीला भेटण्यासाठी मोरेवाडी, अंबाजोगाई येथे आला. २५ मे रोजी त्याने आपल्या बहिणीला फोन करून रडत सांगितले की, दिपालीचे दुसऱ्या एका मुलासोबत प्रेमसंबंध असून तिने डायरीत तसे लिहून ठेवले आहे, जे त्याने वाचले आहे. यावरून त्यांच्या वाद झाला होता. त्यानंतर काही वेळातच गणेशने दिपाली राहत असलेल्या खोलीत गळफास घेतल्याची माहिती नातेवाइकांना मिळाली.

दिपालीचे बाहेरील अनैतिक संबंध आणि मानसिक त्रासामुळेच गणेशने आत्महत्येचे पाऊल उचलल्याचा आरोप त्याच्या आईने केला आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८ नुसार गुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस निरीक्षक वशिष्ठ कांगणे पुढील तपास करत आहेत.

# कर्नाटकचे मुख्यमंत्री यांच्या शपथविधीला मा.खा. रजनीताई पाटील यांची उपस्थिती

**केज दि 4 (प्रतिनिधी) :** कर्नाटक राज्याच्या राजकीय पटलावर नुकत्याच झालेल्या ऐतिहासिक सत्ता बदलाच्या पार्श्वभूमीवर, बंगळुरू येथे पार पडला. भव्य शपथविधी सोहळ्याला देशभरातील प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. या सोहळ्यात काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या,हिमाचल प्रदेश च्या प्रभारी, माजी खासदार मा. रजनीताई पाटील यांनी प्रामुख्याने उपस्थित राहून नवनियुक्त मुख्यमंत्री मा. श्री. डी. के. शिवकुमारजी यांचे विशेष अभिनंदन केले व त्यांना पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

कर्नाटकातील काँग्रेस पक्षाच्या दणदणीत विजयानंतर संपूर्ण देशाचे लक्ष या शपथविधी सोहळ्याकडे लागले होते. बंगळुरू येथील कान्तीरवा स्टेडियमवर अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वरूपात हा सोहळा पार पडला. या दिमाखदार सोहळ्याला काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेतृत्व, विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि देशभरातील दिग्गज नेते उपस्थित होते. यात महाराष्ट्रातून काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या, हिमाचल प्रदेश च्या प्रभारी खा.पाटील यांनी विशेष उपस्थिती दर्शवली.

रजनीताई पाटील यांच्याकडून शुभेच्छांचा वर्षाव

शपथविधी सोहळा संपन्न झाल्यानंतर माजी खासदार रजनीताई पाटील यांनी नवनियुक्त मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पुष्पगुच्छ देऊन शिवकुमारजींचे अभिनंदन केले. "डी. के. शिवकुमार यांच्यासारख्या खंबीर, अभ्यासू आणि तळागाळातील कार्यकर्त्यांशी नाळ जोडलेल्या नेत्याच्या हाती कर्नाटकची धुरा आल्यामुळे राज्याचा विकास अधिक गतीने होईल. हा विजय सर्वसामान्य जनतेचा आणि काँग्रेसच्या विचारसरणीचा आहे," असा विश्वास पाटील यांनी यावेळी व्यक्त

# विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून 'स्मार्ट' मेहनत करावी – विक्रम मांडुरके

**गेवराई (प्रतिनिधी):** विद्यार्थ्यांनी आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आधी स्वत:ला 'का, काय आणि कसं करायचं?' हे तीन प्रश्न विचारून आपले स्पष्ट ध्येय निश्चित केले पाहिजे. आज विद्यार्थ्यांमधील अभ्यासाची जागरूकता कुठेतरी हरवत चालली आहे, ती पुन्हा निर्माण करणे गरजेचे आहे. आता कठोर परिश्रम करून चालणार नाही, तर काळाची पावले ओळखून 'स्मार्ट' मेहनत करावी लागेल. भविष्यात समाजात अभिमानाने आणि स्वाभिमानाने जगायचे असेल, तर आजच्या काळात कठोर धडपड करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असे परखड मत गेवराई नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी व्यक्त केले.

नालंदा फाउंडेशन, बीडच्या वतीने गुरुवारी गेवराई येथील छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृहात दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ तसेच करिअर मार्गदर्शन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुकुल संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल होते. तर प्रमुख अतिथी म्हणून काकडे सर, डोंगरे सर आणि शैक्षणिक समूहाचे प्रशासकीय अधिकारी प्रा. डी. डी. राऊत उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात डॉ. विजयकुमार बांदल यांनी संस्थेचे उपक्रम, विविध अभ्यासक्रम आणि उपलब्ध करिअर संधी याविषयी सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यानंतर दहावी व बारावी परीक्षेत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# कळंबच्या नगराध्यक्षा सुनंदाताई कापसे यांनी घेतले प्रभू वैद्यनाथाचे दर्शन

## शेतकरी व कष्टकऱ्यांच्या सुख-समृद्धीसाठी वैद्यनाथा चरणी केली प्रार्थना

**परळी वैजनाथ | :** अधिकमासाच्या पवित्र पावन पर्वाचे औचित्य साधत कळंब नगरीच्या नगराध्यक्षा तथा शिवसेना (शिंदे गट) नेत्या सौ. सुनंदाताई शिवाजीआप्पा कापसे यांनी श्रीक्षेत्र परळी वैजनाथ येथे भेट देऊन बारा ज्योतिर्लिंगांपैकी पंचम ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी पूजा-अर्चना करून राज्यातील जनतेच्या आरोग्य, सुख-समृद्धी तसेच शेतकरी बांधवांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. सौ. सुनंदाताई कापसे यांनी कळंब शहरातील सुमारे ५१ महिला भक्तांसमवेत वैद्यनाथ धाम यात्रा पूर्ण केली.



याबाबत अधिक माहिती असते, सध्याला पुरुषोत्तम मासाचे पावन सर्व सुरू आहे. भारतीय धार्मिक पुरुषोत्तम मासास अनन्यसाधारण महत्त्व आहे. याचे औचित्य साधत अधिकमासाच्या धार्मिक वातावरणात कळंबच्या प्रथम नागरिक सौ. सुनंदा शिवाजीआप्पा कापसे यांनी महिला माता-भगिनींसह भक्तिभावाने दर्शन घेतले. यावेळी प्रभू वैद्यनाथाच्या चरणी नतमस्तक होत त्यांनी सर्वांच्या मंगलमय जीवनासाठी साकडे घातले.

यावेळी त्यांनी राज्यातील नागरिकांचे आरोग्य उत्तम राहावे, सर्वांना सुख-समाधान लाभावे तसेच बळीराजाच्या जीवनात समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना केली. आगामी पावसाळ्यात चांगला व समाधानकारक पाऊस होऊन, शेतकऱ्यांची शिवार हिरवाईने भरून यावीत, बळीराजाच्या अपेक्षा पूर्ण व्हाव्यात, असे साकडे त्यांनी प्रभू वैद्यनाथास घातले.

तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा सर्वांगीण विकास होऊन सर्वसामान्यांच्या जीवनात आनंद, समृद्धी व प्रगतीचे दिवस यावेत, अशी प्रार्थनाही त्यांनी केली.

या धार्मिक यात्रेत नगराध्यक्ष सौ सुनंदाताई कापसे यांच्या समवेत सौ. अपर्णा टेळे, हिरा यादव, स्वाती घुले, श्रीमती वनमाला खापे, कल्पना सोनवणे, सीमा थोरात, सौ. जान्हवी खापे, कल्पना चाळक, यांच्यासह कळंब नगरीतील अनेक महिला भक्त, माता-भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. पुरुषोत्तम मासाच्या पावन पर्वात पार पडलेल्या वैद्यनाथ धाम यात्रेच्या निमित्ताने सर्व माता भगिनी तथा फक्त गणामध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# खरेदी-विक्री संघाच्या सभापतीपदी माणिक लोडे, उपसभापती निखील बांगर यांची निवड

## आ. तान्हाजीराव मुटकुळेंच्याहस्ते सत्कार, फटाक्यांची आतिषबाजी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

येथील खरेदी विक्री संघाच्या सभापती आणि उपसभापती पदाची निवडणूक आज अत्यंत उत्साहात आणि खेळीमळीच्या वातावरणात पार पडली. यामध्ये सभापती पदी भारतीय जनता पार्टीचे माणिक लोडे तर उपसभापती पदी निखिल बांगर यांची सर्व संचालकांनी एकमताने निवड केली आहे. या निवडीनंतर भाजपा आणि मित्र पक्षाच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी करत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

खरेदी विक्री संघाच्या नवनिर्वाचित संचालकांची विशेष सभा शुक्रवार दि ५ जून रोजी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बोलवण्यात आली होती. सभापती पदासाठी माणिक लोडे व उपसभापती पदासाठी निखिल बांगर यांचेच एकमेव अर्ज आल्यामुळे, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी या दोन्ही निवडी बिनविरोध आणि एकमताने झाल्याचे घोषित केले यावेळी संचालक उमेश नागरे,नारायण इंगोले, विठोबा मुटकुळे,भानुदास वामन, सदाशिव थोरात, रमेश चौधरी, सौ.किरण बर्वे आणि सौ. सरस्वती जाधव उपस्थित होते.

यानंतर भारतीय जनता पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयात आमदार तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी सभापती व उपसभापतीचे सत्कार केले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जेष्ठ नेते के.के शिंदे, माजी जि.प सदस्य प्रकाशराव थोरात, प्रा.गुलाब भोयर, नारायण खेडेकर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, उत्तमराव जगताप, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, नगरसेवक हमीद प्यारेवाले, बंडु कऱ्हाळे, संतोष टेकाळे, मनोज शर्मा,,सदाशिव सुर्यतळ, श्रीरंग राठोड, संदीप वाकडे, राजेश बांगर, सचिन बांगर, बळीराम गुट्ठे, अमित रुहाटिया यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना नवनिर्वाचित सभापती माणिक लोडे म्हणाले की आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्यासह सर्व संचालकांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवून शेतकरी आणि सभासदांच्या हितासाठी खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून विविध कल्याणकारी योजना राबवल्या जातील. तालुक्यात कापूस, सोयाबीन व इतर शेतीमालाच्या खरेदी-विक्रीची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यावर आमचा भर राहील. तर उपसभापती निखिल बांगर यांनीही सर्वांचे आभार मानत संघाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

या निवड प्रसंगी भाजप व महायुतीचे वरिष्ठ पदाधिकारी, संचालक मंडळाचे सर्व सदस्य, विविध सहकारी संस्थांचे अध्यक्ष आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. निवडीनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा उपस्थिती होती.

# केसापूर येथे महिला व बाल कल्याण संरक्षणाबाबत जनजागृती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

हिंगोली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बालकांचे संरक्षण, बालहक्क, बालकांवरील अत्याचार प्रतिबंध तसेच विविध पोलिस व बाल संरक्षण कायद्यांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने मौजे केसापूर, ता. जि. हिंगोली येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात ग्रामस्थ, महिला, युवक व बालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी दामिनी पथकाच्या अधिकारी अझख प्रेमलता जगताप यांनी महिलांच्या व बालकांच्या सुरक्षेसाठी अस्तित्वात असलेल्या विविध कायद्यांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी महिलांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, छेडछाड, सायबर गुन्हे, मानवी तस्करी तसेच बालकांवरील लैंगिक अत्याचार यांसारख्या गंभीर विषयांवर मार्गदर्शन केले. महिलांच्या संरक्षणासाठी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या विविध कायदेशीर तरतुदींची माहिती देत कोणत्याही प्रकारच्या अन्याय, अत्याचार किंवा शोषणाची घटना घडल्यास तात्काळ पोलिस प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६, गाव बाल संरक्षण समिती, पोक्सो कायदा, बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५, बालकांचे हक्क, बाल संरक्षण यंत्रणा, संकटग्रस्त व गरजू बालकांसाठी उपलब्ध शासकीय सुविधा, बालकल्याण समितीची भूमिका तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. बालकांवरील अत्याचार, दुर्लक्ष, शोषण अथवा बालविवाहाची माहिती मिळाल्यास ती तात्काळ संबंधित यंत्रणांना देण्याचे आवाहन त्यांनी केले.

तसेच चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या मोफत व २४ तास उपलब्ध असलेल्या आपत्कालीन सेवेबाबत माहिती देत अडचणीत असलेल्या किंवा संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले. बालकांना कोणतीही समस्या निर्माण झाल्यास अथवा इतर कोणतेही बालक संकटात आढळल्यास तात्काळ १०९८ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमास महिला पोलीस आरती साळवे, पोलीस अंमलदार गणेश सोनटक्के, पोलीस हवालदार हिम्मतराव सरनाईक, तथागत इंगळे (चाईल्ड हेल्पलाईन १०९८), दामिनी पथकातील अधिकारी व कर्मचारी, शाळेचे मुख्याध्यापक हरिभाऊ मुटकुळे, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थित महिला, युवक व बालकांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. सदर जनजागृती कार्यक्रमामुळे महिला व बालकांच्या हक्कांबाबत तसेच त्यांच्या संरक्षणासाठी उपलब्ध कायदे, सेवा व यंत्रणांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण झाली. महिला व बालकांवरील अत्याचारमुक्त, सुरक्षित व संवेदनशील समाज निर्मितीसाठी अशा प्रकारच्या जनजागृती उपक्रमांची नितांत आवश्यकता असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत कामांचे प्रस्ताव सादर करा- गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत चालू आर्थिक वर्षातील कामांचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हरे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी ग. गो. चितळे, प्रदीप नळगीरकर, समाज कल्याणच्या सहायक आयुक्त गीता गुठ्ठे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले की, सन २०२६-२७च्या निधी मागणी प्रस्तावांसोबत युआयडी देणे बंधनकारक असून, काम सुरू करण्यापूर्वीचे जीओ-टॅग छायाचित्र अपलोड करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व यंत्रणांनी त्यांच्या कामांचे युआयडी तयार करून प्रस्ताव सादर करावेत. तसेच चालू वर्षातील तांत्रिक मान्यतेचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

जनसुविधा व नागरी सुविधा योजनेंतर्गत स्मशानभूमीची कामे प्राधान्याने प्रस्तावित करावीत. शिक्षण विभागाने आदर्श शाळा योजनेसाठी पात्र शाळांची यादी तयार करून प्रस्ताव पाठवावेत. क्रीडा विभागाने व्यायामशाळा व क्रीडांगण विकासाची कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी ग्रामीण भागातील कामे जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत तर नागरी भागातील कामे संबंधित मुख्याधिकाऱ्यांमार्फत करावीत, असे त्यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागाने औषध खरेदी करताना उपलब्ध शिल्लक साठा, वापर आणि आवश्यकतेचा आढावा घेऊन सविस्तर प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

यावेळी सार्वजनिक बांधकाम, क्रीडा, शिक्षण, आरोग्य, नगर विकास, कौशल्य विकास, पशुसंवर्धन, मत्स्यविकास, ग्रामविकास आदी विभागांच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. राज्य शासनाने हिंगोली जिल्ह्याला आकांक्षित जिल्हा म्हणून घोषित केले असून, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा नियमित आढावा घेऊन शासनाने निश्चित केलेल्या निर्देशांकानुसार प्रभावी कामे करावीत. संबंधित माहिती गुगल शीटवर अपलोड करून सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

# जलयुक्त शिवार अभियान व प्रधानमंत्री कृषी सिंचनची कामे गतीने पूर्ण करा- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

जलयुक्त शिवार अभियान २.० व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत सुरू असलेल्या कामांना गती देऊन ती विहित कालावधीत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जलयुक्त शिवार अभियान २.०, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० तसेच गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार योजना अंतर्गत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वसमतचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी, उपविभागीय जलसंपदा अधिकारी, सर्व तालुका कृषी अधिकारी, कृषी उपसंचालक तसेच जलसंधारण अधिकारी (लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद) उपस्थित होते.

या बैठकीत कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत ढाळीचे बांध, डीपीसीसीटी, सिमेंट नाला बांध, संयुक्त गॅबियन बंधारा, अनघड दगडी बांध आदी कामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. पूर्ण, अपूर्ण व प्रगतीपथावरील कामांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना अपूर्ण कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सर्व प्रकल्पांची कामे आराखड्यानुसार विहित मुदतीत पूर्ण करण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले. प्रगतीपथावरील कामांचे छायाचित्रे व व्हिडिओ सादर करण्याच्या सूचनाही करण्यात आल्या. उत्पादन पद्धतीअंतर्गत वैयक्तिक शेतकरी लाभार्थ्यांना शेती साहित्य खरेदीसाठी प्रोत्साहित करण्याबरोबरच अनुदान खर्चाच्या प्रगतीचाही आढावा यावेळी घेण्यात आला.

जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत निवड करण्यात आलेल्या गावात या अभियानात जलसंधारण विभाग, लघुसिंचन (ल.पा. जि.प.), कृषी विभाग, वन विभाग, सामाजिक वनीकरण, पूर्णा पाटबंधारे विभाग व भूजल सर्वेक्षण विभाग सहभागी आहेत. सर्व संबंधित यंत्रणांनी कामे मुदतीत पूर्ण करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

नदीमधील गाळ शेतकऱ्यांना शेतीमध्ये वापरण्यासाठी उपलब्ध करून द्यावा. नदीपात्रातून काढलेला गाळ पुन्हा नदीत गेल्यास संबंधित कंत्राटदारांची देयके अदा करण्यात येणार नाहीत, याची नोंद घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

पावसाच्या पाण्याची साठवणूक आणि प्रत्येक थेंबाचे संवर्धन या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व जलसाठ्यांची गणना व जिओ-टॅगिंग करण्याचे काम तातडीने सुरू करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी संबंधित विभागांना दिले.

# वनविभागाच्यावतीने शहरात वृक्षारोपन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

वनविभाग आणि भारतीय जनता पार्टीच्या वतीने आणि मोदी सरकारच्या कार्यकाळाला १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, जून महिन्यात हिंगोली शहरात विविध सामाजिक व रचनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वप्रथम मागील वर्षी लावेल्या झाडांचे सौ.जिजाबाई मुटकुळे यांनी पुजन केले यानंतर वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात खासदार रामराव वडकुते, आमदार तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, विभागीय वन अधिकारी पुष्पा पवार यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, युवामोर्चा अध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, जेष्ठ नेते के. के शिंदे, नारायण खेडेकर, माजी जि.प सदस्य प्रकाश थोरात, जिल्हा सरचिटणिस उमेश नागरे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, नगरसेवक हमीद प्यारेवाले, माणिक लोडे, संतोष टेकाळे, बाबाराव घुगे, मनोज शर्मा, नरेश अग्रवाल, बंडु कऱ्हाळे, सदाशिव सुर्यतळ, श्रीरंग राठोड, संदीप वाकडे, अमित रुहाटिया, सचिन शिंदे, आशिष जैस्वाल, डॉ.भानुदास वामन,मुकुंद नायक,चांदु लांडगे, विशाल दुधळकर, मंहमद प्यारेवाले यांच्यासह वनविभागाचे आधिकारी संदीप शिंदे, संदीप वाघ, गोपाल बिरसवने, जयश्री बरगे उपस्थित होत्या.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आ. मुटकुळे यांच्या निवासस्थाना बाहेरील परिसर व महाकालींका मंदीर तसेच विविध प्रमुख भागांत आणि खुल्या मैदानांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले केवळ झाडे लावणे एवढाच उद्देश नसून, या झाडांच्या जगवणुकीची आणि संवर्धनाची जबाबदारी कार्यकर्त्यांवर सोपवण्यात आली आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नागरिकांनीही या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मान्यवरानी केले.

# हिंगोलीत ग्रंथराज दासबोध पारायण सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

पुरुषोत्तम मास पर्वकाळा निमित्त श्रीमद् ग्रंथराज दासबोध पारायण दि. २७ मे २०२६ ते ०२ जुन २०२६ या कालावधित ह.भ.प. सर्वेश शुक्ल ह्यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्सव संपन्न झाला. पहिल्या व दुसऱ्या दिवशी हभप. सौ. वेदश्री ओक ह्यांचे सुश्राव्य असे कीर्तन झाले. तिसऱ्या दिवशी हभप सौ.जानाबाई डोंगरे ह्यांचे कीर्तन झाले. चौथे व पाचवे दिनी हभप सुनील महाराज आष्टीकर ह्यांचे सुशाव्य असे कीर्तन झाले. सहावे दिनी हभप. साध्वी त्रिवेणी ताई देशमुख (दीदी ) ह्यांचे कीर्तन झाले. सातवे दिनी ह.भ.प. सर्वेश महाराज शुक्ल ह्यांचे काल्याचे झाले व महाआरती व भंडारा झाला. अथर्व देशमुख, अनिरुद्ध पांडे, मंगेश पांडे, चैतन्य देशपांडे ह्यांनी सुंदर अशी साथ केली. श्री दत्त मंदिर अध्यक्ष यांचे दत्त सेवा समिती व श्रीराम सेवा मंडळाने आयोजन केले होते. यावेळी मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती.

# कोनाथा येथे जय भवानी शेतकरी पॅनलचा १२ पैकी ११ जागांवर विजय



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ५ जून**

वसमत तालुक्यातील कोनाथा येथे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सोसायटीची निवडणुक पार पडली. यामध्ये जय भवानी पॅनलला १२ पैकी ११ जागा मिळाल्या आहेत. शेतकरी विकास पॅनलचे ओमकार बेंडे यांनी १०१ मत मिळवली. यामध्ये मते पडली उमेदवार जय भवानी विकास पॅनलचे मते पडले व निवडून आलेले उमेदवार चंद्रकांत बेंडे ११७ मते मिळवले व विजयी झाले. अरुणाबाई युवराज बेंडे यांनी १२९ मते मिळवून विजय निश्चित केला श्रीमती निलाबाई बेंडे यांनी ११३ मते मिळाले व विजयी झाले सुरेशराव बेंडे १२३ मते मिळवून विजय झाले बाळासाहेब बेंडे १२२ मते मिळवून विजयी झाले बालाजी बेंडे यांना १०१ मते मिळवली विठ्ठलराव बेंडे ११४ मते मिळून विजयी झाले शिवाजीराव बेंडे ११९ मते मिळून विजयी झाले संतोष बेंडे १०९ मते मिळून विजयी झाले निवृत्तीराव बेंडे ११५ मते मिळून विजयी झाले दत्तराव साखरे १२२ मते मिळून विजयी झाले जिजाजी ढोके यांना ११७ मते मिळून विजयी झाले जय भवानी शेतकरी विकास पॅनलचे विजयी उमेदवार झालेले गावकऱ्यांच्या वतीने भव्य दिव्य असा सत्कार करण्यात आला व मतदान शांततेत पार पडले. यावेळी हट्टा पोलीस स्टेशनचा बंदोबस्त तैनात केला होता. गावातील पोलीस पाटील शासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप शक्तीकेंद्र प्रमुखांची आढावा बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

येथील भाजपा जनसंपर्क कार्यालयात मतदार यादी विशेष पुनरावलोकन मोहिमेअंतर्गत शक्तीकेंद्र प्रमुखांची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत एस आय आर मोहिमेची प्रगती, मतदार यादी अचूक करणे, आणि नवीन मतदारांची नोंदणी यावर सखोल चर्चा करण्यात आली. एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय राहण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले असून केंद्र व राज्य शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. या बैठकीला माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर,युवानेते शशिकांत वडकुते, जिल्हा सरचिटणिस उमेश नागरे, जिल्हा सरचिटणिस सुनिताताई मुळे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, श्रीरंग राठोड, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, कार्याध्यक्ष पवन उपाध्ये, नगरसेवक उमेश गुठ्ठे, राजेश गोटे, कैलाश शहाणे, बाबाराव घुगे, रामेश्वर गायकवाड, मनोज शर्मा, कैलाश श्रीनाथ, नरेश अग्रवाल, सदाशिव सुर्यतळ, सुनिल राठौर, समिर भिसे, संदीप वाकडे, निखील बांगर, गुड्डू देवकते, संतोष साबळे, अमित रुहाटिया, सचिन व्यास, राहुल शिंदे, शेख अतीक, गोविंद कऱ्हाळे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पोलिस अधीक्षक कार्यालयात वृक्षारोपन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून येथील 'शिवकृपा बहुउदेशिय सेवाभावी संस्थेच्या' वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशासकीय अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या वृक्षारोपण कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक निलभ रोहन यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा वन अधिकारी नाळे, केंद्रे, डॉ. झडपे, कृषी अधिकारी कछवे, आणि जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.संस्थेचे अध्यक्ष राहुल घेवारे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# विना नंबरच्या बोलेरोतून लाखोंचा गुटखा जप्त

## एकाच आठवड्यात दुसऱ्यांदा कारवाई; चालक फरार

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ५ जुन -**

इस्लापूर परिसरात गुटखा तस्करीचे जाळे किती खोलवर रुजले आहे, याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला आहे. एकाच आठवड्यात दुसऱ्यांदा अन्न व औषध प्रशासन विभागाने धडक कारवाई करत विना नंबरच्या बोलेरो पिकअप वाहनातून वाहतूक होत असलेला तब्बल १७ लाख ५२ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सलग दोन कारवाया झाल्याने परिसरात गुटखा माफियांचे संघटित रॅकेट कार्यरत असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ५ जून रोजी रात्री १२.४५ वाजण्याच्या सुमारास निर्मल रोड, शिवणी येथे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने संशयित वाहनाची तपासणी केली. यावेळी विना नंबरच्या बोलेरो पिकअप वाहनातून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक होत असल्याचे उघडकीस आले. पथकाने तत्काळ कारवाई करत वाहनासह माल जप्त केला.



या कारवाईत २ लाख ५२ हजार ४५० रुपयांचा प्रतिबंधित माल आणि १५ लाख रुपये किमतीचे बोलेरो पिकअप वाहन असा एकूण १७ लाख ५२ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मात्र कारवाईची चाहूल लागताच चालकाने वाहन सोडून घटनास्थळावरून पलायन केल्याची माहिती समोर आली आहे.

विशेष म्हणजे, इस्लापूर परिसरात अवघ्या काही दिवसांत झालेली ही दुसरी मोठी कारवाई आहे. त्यामुळे प्रशासनाच्या सातत्यपूर्ण धाडीनंतरही लाखो रुपयांचा प्रतिबंधित माल परिसरात कसा पोहोचतो, हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

गावोगावी सहज उपलब्ध होणारा गुटखा, रात्री-अपरात्री सुरू असलेली संशयित वाहनांची वर्दळ आणि वारंवार उघडकीस येणारी प्रकरणे पाहता, या व्यवसायामागे मोठे आर्थिक जाळे कार्यरत असल्याचा संशय बळावत आहे.

या कारवाईतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे विना नंबरच्या वाहनातून मालाची वाहतूक होत होती. वाहनावर कोणतीही ओळख नसताना ते अनेक किलोमीटरचा प्रवास करून परिसरात कसे पोहोचले? कोणत्या मार्गाने आले? आणि संबंधित यंत्रणांच्या नजरेतून ते कसे सुटले? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

प्रशासनाच्या कारवाईत वाहन व माल जप्त होत असला, तरी या अवैध व्यवसायाचे खरे सूत्रधार अद्याप समोर येत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. वाहतूक करणारे चालक आणि छोटे एजंट कारवाईच्या कक्षेत येतात; मात्र लाखो रुपयांची उलाढाल करणारे मुख्य पुरवठादार आणि आर्थिक पाठबळ देणारे लोक अद्याप मोकाट असल्याची भावना व्यक्त होत आहे.

जनतेतून संतप्त प्रतिक्रिया

सलग दुसऱ्या कारवाईनंतर नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. एकाच आठवड्यात दोन कारवाया होतात म्हणजे तस्करी किती मोठ्या प्रमाणात सुरू असेल? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. तसेच बाहेरून येणारे फेरीवाले लाखो रुपयांचा माल परिसरात उतरवून जातात, मात्र त्यांच्यावर कायमस्वरूपी लगाम कधी लागणार, अशी मागणीही जोर धरू लागली आहे.

**सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधवर यांच्याकडे तपासाची धुरा**

या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधवर हे करीत आहेत. फरार चालक, वाहन मालक तसेच या संपूर्ण तस्करीमागील साखळीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. जप्त करण्यात आलेल्या मालाचा उगम, पुरवठादार आणि वितरण यंत्रणा याबाबतही सखोल चौकशी सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईमुळे गुटखा माफियांना मोठा धक्का बसला आहे. सलग दुसऱ्या धाडीत लाखोंचा मुद्देमाल जप्त झाल्याने इस्लापूर परिसरातील अवैध गुटखा व्यवसायाविरोधात प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र या कारवाया केवळ जप्तीपुरत्या मर्यादित न राहता संपूर्ण रॅकेट उद्ध्वस्त करण्यापर्यंत पोहोचाव्यात, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# खा.अशोक चव्हाण यांच्या आश्वासनानंतर डूबूकवाड यांचे आमरण उपोषण मागे

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ५ जुन -**



मुदखेड शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात यावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते मारुती डुबुकवाड यांनी सुरू केलेले आमरण उपोषण अखेर माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावजी चव्हाण यांच्या मध्यस्थीने मागे घेण्यात आले.

गेल्या २१ दिवसांपासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा स्थापनेच्या मागणीसाठी साखळी उपोषण सुरू होते. मात्र,प्रशासनाकडून मागणीची अपेक्षित दखल घेतली जात नसल्याने उपोषणकर्ते मारुती डुबुकवाड यांनी या आंदोलनाचे रूपांतर आमरण उपोषणात केले होते.त्यांनी आपल्या मागणीसाठी तीव्र आंदोलन छेडत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान,राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी या प्रश्नात मध्यस्थी करत उपोषणकर्ते व आंबेडकरी अनुयायांशी चर्चा केली. यावेळी त्यांनी मुदखेड शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल व लवकरच ही मागणी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.

खा.अशोकराव चव्हाण यांच्या आश्वासनानंतर उपोषणकर्ते मारुती डुबुकवाड यांनी आपले आमरण उपोषण मागे घेतले. यावेळी आंबेडकरी अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खा.अशोकराव चव्हाण यांच्या आश्वासना नंतर या आंदोलनाला तात्पुरता विराम मिळाला असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याची मागणी लवकरच पूर्ण होईल,अशी अपेक्षा आंबेडकरी समाजबांधवांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## स्वामीरामानंदतीर्थमराठवाडाविद्यापीठावर सिनेट म्हणून आ. कोहळीकरांची नियुक्ती

**हदगाव** -शिक्षण क्षेत्रातील अत्यंत मानाचे व विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची निगडित असलेल्या महत्त्वाच्या विषयांना व अडचणींच्या प्रश्नांना तात्काळ मार्गी लावण्याच्या दृष्टिकोनातून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अधि सभेवर सिनेट म्हणून हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांची महाराष्ट्र राज्य विधिमंडळाकडून सन्मानपूर्वक नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्र विधिमंडळ सचिवाल्याच्या वतीने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना पत्राद्वारे या निवडीबाबत अधिकृतपणे सूचित करण्यात आले या नियुक्तीमुळे विद्यापीठाच्या उच्च वर्तुळात आणि शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून हदगाव हिमायतनगर परिसरातील विद्यार्थी, शिक्षण प्रेमी, प्राध्यापक वर्ग यांच्यासह नांदेड व मराठवाडा या परिसरातील शिक्षणप्रेमीतून अभिनंदन व्यक्त होत आहे.



## नेसुबो कृषी महाविद्यालयात मरखेल येथे ग्रामिण कृषी कार्यानुभव कार्यक्रम

**हाणेगाव** -वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाशी संलग्न असलेले, नेताजी सुभाष चंद्र बोस कृषि महाविद्यालय मरखेल तालुका देगलूर जिल्हा नांदेड अंतर्गत अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत ग्राम भेट दौरा व परिचय बैठक उत्साहात पार पडली. मंगळवार दिनांक २ जून २०२६ रोजी कृषी पदवीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांकडून राबवण्यात येणाऱ्या ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमाच्या अनुषंगाने ही भेट आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांची भेट घेऊन सविस्तर माहितीची देवाण-घेवाण केली. शेतकरी हा केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी विद्यापीठातील सुधारित वाण, तंत्रज्ञान व माती परीक्षण व इतर माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. तसेच ग्रामीण कृषी विकासामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका शेतकऱ्यांसाठी उपयुक्त कृषी उपक्रम आणि आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी विषयक योजनांबाबत चर्चा करण्यात आली ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले व तसेच या उपक्रमासाठी पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका ग्रामपंचायत व गावातील प्रगतशील शेतकरी यांनी व्यक्त केली. यावेळी आमदापूर गावातील कृषीदूत नरेश चव्हाण, हर्षल जगताप, शुभम कुऱ्हाडे, प्रणव मुंडे, इर्शाद पटेल, व्यंकट ऱ्यापनवार आदी विद्यार्थ्यांनी कृषी विषयक मार्गदर्शन करून ग्रामस्थांना विविध उपयुक्त माहिती दिली. कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य एम. आर. मुळे सर, कार्यक्रम समन्वयक प्राध्यापक भाऊसाहेब कदम सर, कार्यक्रम अधिकारी डॉ. पी. आर. ठोंबरे व व सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



## शिवसेना महिला तालुकाप्रमुखपदी 'संघर्षकन्या' गंगूताई परेकर यांची निवड!

**किनवट** -बहुजन समाजातील संघर्षशील नेतृत्व आणि जनसामान्यांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या श्रीमती गंगूताई परेकर यांची शिवसेना (शिंदे गट) महिला तालुकाप्रमुख पदावर निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी किनवटसारख्या दुर्गम भागातील या रणरागिणीच्या कार्याची दखल घेत ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. या निवडीमुळे सर्वसामान्य कुटुंबातील महिलांना न्याय मिळाल्याची भावना मतदारसंघात उमटत आहे. गंगूताई परेकर यांनी घर तिथे झेंडा आणि गाव तिथे शाखा या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवत हिंदुत्ववादी विचारधारेचा अजेंडा घराघरांपर्यंत पोहोचवला आहे. त्यांच्या याच प्रामाणिक कष्ट आणि निष्ठेची दखल घेत पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी दिली. आपल्या निवडीनंतर भावूक आणि आक्रमक होत गंगूताई म्हणाल्या, मी एकनाथ भाई शिंदे माऊली असून पक्षाची निष्ठावंत सदस्य आहे. येणाऱ्या काळात किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघ संपूर्णपणे भगवामय केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही. विधानसभेवर शिवसेनेचा भगवा झेंडा फडकवण्यासाठी मी घरावर तुळशीपत्र ठेवून अहोरात्र काम करेन. तसेच, आगामी काळात तालुक्यात 'मोठा राजकीय बॉम्ब' फुटण्याची दाट शक्यता असल्याचे संकेतही त्यांनी दिले.आपली पुढील वाटचाल नांदेड जिल्ह्याचे नेते तथा उपनेते आमदार हेमंत पाटील, राजश्रीताई पाटील, तालुकाप्रमुख बालाजी मुरकुटे, माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, उपतालुकाप्रमुख गजानन कोल्हे पाटील, माजी सभापती मारुतीदादा सुंकलवाड, महिला जिल्हाध्यक्ष शितलताई भांगरे-पाटील व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करणार असल्याचे त्यांनी सांगितले. गंगूताई यांच्या निवडीबद्दल अभिनंदन होत आहे.



# बौद्ध भंतेंच्या संघर्षाला मुस्लिम समाजाचा पाठिंबा; जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ जुन -**

कल्याण येथे बुद्धभूमी उद्ध्वस्त करून तथागत गौतम बुद्धांच्या मूर्तीची विटंबना, बौद्ध स्तूपाची तोडफोड आणि भीमा कोरेगाव विजयस्तंभाच्या प्रतिकृतीचे नुकसान करण्यात आल्याच्या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत मुस्लिम महासंघ, नांदेडच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले.

मुस्लिम महासंघाचे संयोजक अख़िल फारुकी व अब्दुल वहीद यांच्या पुढाकारातुन निवृत्त न्यायाधीश युनूस पटेल व फारुक अहमद यांच्या नेतृत्वात विविध सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन हे निवेदन दिले. या वेळी उपस्थितांनी ही घटना केवळ एका



समाजाच्या श्रद्धास्थानावरील हल्ला नसून भारतीय संविधानातील समता, बंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या मूल्यांवर झालेला गंभीर आघात असल्याचे नमूद केले.

निवेदनात म्हटले आहे की, कल्याण येथील बुद्धभूमीवरील कारवाईमुळे बौद्ध समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून राज्यातील सामाजिक सलोखा धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तथागत बुद्धांच्या विचारांनी देशाला शांतता, करुणा आणि मानवतेचा संदेश दिला असताना त्यांच्या स्मृतींशी संबंधित स्थळांवर अशा प्रकारे बुलडोझर चालविणे अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह आहे.

मुस्लिम महासंघाने या प्रकरणाची उच्चस्तरीय व न्यायालयीन देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी केली असून बुद्धभूमी उद्ध्वस्त करण्यास जबाबदार असलेल्या सर्व व्यक्ती व अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच उद्ध्वस्त करण्यात आलेली बुद्धभूमी शासनाच्या खर्चातून तात्काळ पूर्ववत करून तेथील स्तूप, वृक्षसंपदा आणि इतर ऐतिहासिक स्मृतींचे पुनर्निर्माण करण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.

यावेळी मुस्लिम महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, अन्याय कोणावरही झाला तरी त्याविरोधात उभे राहणे हेच संविधानिक आणि मानवी कर्तव्य आहे. बुद्धभूमीवरील हल्ला हा केवळ बौद्ध समाजाचा प्रश्न नसून सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांवरचा हल्ला आहे. त्यामुळे मुस्लिम समाज बौद्ध भंतेंच्या आणि बौद्ध समाजाच्या न्याय्य लढ्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.

निवेदन स्वीकारताना निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी संबंधित मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, दोषींवर तात्काळ कारवाई न झाल्यास राज्यभर व्यापक लोकशाही आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला.

बुद्धभूमीचा अपमान सहन केला जाणार नाही; संविधान आणि सामाजिक न्यायाच्या रक्षणासाठी सर्व समाजांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# जागतिक पर्यावरणदिनी हरित नांदेड अभियानाचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ जुन -**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका व वृक्षमित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन महापालिकेच्या माता गुजरीजी विसावा उद्यान येथील आयोजित कार्यक्रमात हरित नांदेड अभियानास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणुन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी विविध सामाजिक संस्था व वृक्षमित्र फाउंडेशनचे प्रतिनिधीसुध्दा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका व वृक्षमित्र फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने मागील आठ वर्षापासून लोकसहभागातून वृक्ष लागवड व संगोपनाचे कार्य सुरु असून मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या संकल्पनेतून हरित नांदेड उपक्रमा अंतर्गत २०२६ च्या मान्सूनमध्ये महानगरपालिका व वृक्षमित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा हद्दीत एकूण १८००० वृक्ष लागवड करण्यात येणार असून या अभियानाची सुरुवात पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दि. ५ जून रोजी माता गुजरीजी विसावा उद्यान



येथे वृक्षारोपण करण्यात आले आहे.

नांदेड शहराचे वाढलेले तापमान नियंत्रित करण्यासाठी सर्व सामाजिक संस्था एकवटल्या असून नियोजनबध्द कार्यक्रमातून वृक्षांची लागवड करुन त्यांचे संवर्धन करण्यासाठी महापालिका प्रशासन, वृक्षमित्र फाउंडेशन, गुरुव्दारा लंगर साहिब व शहरातील विविध सामाजिक संस्था या सर्वांच्या पुढाकाराने व सहकार्याने हरित नांदेड हे अभियान यशस्वी करण्यात येणार असून या अभियानाची सुरुवात विसावा उद्यान येथे प्रातिनिधीक स्वरुपात वृक्षारोपण करुन करण्यात आली आहे.

येणाऱ्या काळात शहरातील विविध भागात वृक्षरोपण करुन लागवड करण्यात आलेले वृक्ष जोपासण्याच्या दृष्टिकोणातून सामाजिक संघटने मार्फत ट्री गार्ड व ठिबक इत्यादी आवश्यक बाबींची पूर्तता केली जाणार आहे.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना आजमितीस शहरामध्ये मनपा हद्दीत मागील वर्षी वृक्षगणना करण्यात आली असून शहरामध्ये आज रोजी केवळ ३.१० लक्ष झाडे अस्तित्वात असून आजमितीस शहरातील ८.५० लक्ष लोकसंख्या विचारात घेता आज आपण एक व्यक्ती एक झाड याप्रमाणेसुध्दा पूर्तता करण्यास कमी पडलो असल्याने भविष्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करणे आवश्यक असल्याचे नमूद करुन शहरातील पर्यावरणप्रेमी व सुजान नागरिकांनी हरित नांदेड अभियानात जास्तीत जास्त सहभाग घेऊन सदरील अभियान यशस्वी करण्याचे आवाहन यावेळी आयुक्तांनी केले आहे.

यावर्षी या अभियानांतर्गत शहरातील २० मनपा प्रभागात प्रत्येक प्रभागात ५० मोठे वृक्ष ट्रीगार्डसह लावण्याचा संकल्प केलेल्या आहे. यामध्ये ट्री गार्ड लोकसहभागातून व खड्डा करून वृक्ष लावणे हे महानगरपालिकेकडून कार्य करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त शहरातील मोकळ्या जागा, स्मशानभूमी, कब्रस्ताने, मंदिरे, बौद्ध विहार, शासकीय, खाजगी शाळा, महाविद्यालय, विविध कार्यालय, गोदावरी नदीकाठ इत्यादी ठिकाणी देशी जातीचे अठरा हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. यामध्ये महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास प्र.अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार व गिरीश कदम, मुख्य उद्यान अधीक्षक डॉ. मिर्झा फरहतुल्ला बेग, क्षेत्रिय अधिकारी रावण सोनसळे, रमेश चवरे, राजेश जाधव, गौतम कवडे, निलावती डावरे यांची उपस्थिती होती.

## जुन्या भांडणाच्या कारणातून खंजरने मारहाण;तरुणाचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ५ जुन -**

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील विष्णुपुरी येथील अर्जुन बाबुराव हंबर्डे वय ३३ वर्षे राहणार विष्णुपुरी येथील रहिवासी असून दिनांक ४ जून रोजी नऊ वाजताच्या सुमारास जुन्या भांडणाच्या कारणावरून मारहाण झाली असता यामध्ये आरोपीने खंजरने जबर दुखापत केल्याने अर्जुन हंबर्डे हे गंभीर जखमी झाले झाल्याची ही घटना विष्णुपुरी येथील गोविंदराव हंबर्डे यांच्या घराच्या पाठीमागील चौकात काळेश्वर रोडवर घडली.



विष्णुपुरी येथील अर्जुन बाबुराव हंबर्डे हे बँकेत सेवक म्हणून काम करत होते.यांचा आरोपीसी जुन्या भांडणाच्या कारणावरून दिनांक ४ जून रोजी रात्री नऊच्या सुमारास भांडणे झाले असता आरोपींनी खंजरने जबर मारहाण केली . अर्जुन हंबर्डे हा गंभीर जखमी झाला असल्याने त्यास शासकीय रुग्णालयात उपचार करण्यासाठी दाखल करण्यात आले. तेव्हा त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला या गुन्ह्यातील गुन्हेगार प्रवीण एकनाथ हंबर्डे, चैतन्य संजय पांचाळ, आरिफ शेख व सुरज तगडे यांना नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक करून गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक ओमकात चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी मंगेश नाईक हे करत आहेत.

# अरेरावी नडली! सामाजिक वनीकरणमधील दोषी अधिकाऱ्यावर होणार कारवाई

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ५ जुन -**

विहित मुदतीत माहिती न देता प्रशासकीय मुजोरी करणाऱ्या उमरी येथील सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कार्यालयाच्या तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्याला राज्य माहिती आयोगाने मोठा दणका दिला आहे. राज्य माहिती आयोग (खंडपीठ छत्रपती संभाजीनगर) चे माहिती आयुक्तप्रकाश इंदलकर यांनी या अधिकाऱ्याविरुद्ध थेट 'कारणे दाखवा नोटीस' बजावत कठोर शिस्तभंगाच्या कारवाईचे आदेश दिले आहेत. या धडक निर्णयामुळे नांदेड जिल्ह्यातील शासकीय यंत्रणेत प्रचंड घबरेलाट पसरली आहे.

**कायद्याला केराची टोपली दाखवणाऱ्यावर कारवाई**

उमरी येथील धडाडीचे आरटीआय कार्यकर्ते आकाश सैदमवारयांनी सामाजिक वनीकरण कार्यालयाकडे कायदेशीर अर्ज करून काही महत्त्वपूर्ण माहिती मागवली होती. मात्र, संबंधित अधिकाऱ्याने पारदर्शकतेच्या कायद्याला केराची टोपली दाखवत माहिती जाणीवपूर्वक दाबून ठेवली. या प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनीही डोळेझाक केल्याने, अधिकाऱ्याख८ए या अरेरावीविरोधात सैदमवार यांनी राज्य माहिती आयोकडे कायदेशीर लढा पुकारला होता.



**माहिती आयुक्तांचे 'धारदार' आदेश**

सुनावणीदरम्यान अधिकाऱ्यांचा बेजबाबदार आणि मनमानी कारभार चव्हाट्यावर आल्याने आयुक्त प्रकाश इंदलकर यांनी तीव्र संताप व्यक्त केला. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर ओढलेले ताशेरे आणि जारी केलेले कडक आदेश खालीलप्रमाणे आहेत:

**कारणे दाखवा नोटीस**

आरटीआय कायद्याचा गंभीर भंग केल्याप्रकरणी तत्कालीन अधिकाऱ्याविरुद्ध शिस्तभंग आणि कठोर दंडात्मक कारवाई का करू नये? याचा लेखी खुलासा मागवण्यात आला आहे. खुलासा समाधानकारक नसल्यास थेट एकतर्फी कारवाईची कुऱ्हाड कोसळणार आहे.

**३० दिवसांचा अल्टिमेटम**

वर्तमान जन माहिती अधिकाऱ्यांनी आगामी ३० दिवसांच्या आत संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थी आकाश सैदमवार यांना तपासणीसाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक केले आहे.

**माहिती पूर्णपणे मोफत**

अधिकाऱ्याख८ए नाकर्तेपणामुळे अर्जदाराला झालेल्या मानसिक आणि शारीरिक त्रासापोटी, कागदपत्रांच्या तपासणीनंतर अपिलार्थींनी निवडलेली सर्व माहिती कलम ७(६) नुसार पूर्णपणे मोफत (विनामूल्य) देण्याचे आदेश दिले आहेत.

**प्रशासकीय वर्तुळात खळबळ**

या महत्त्वपूर्ण आदेशाच्या काटेकोर अंमलबजावणीची जबाबदारी नांदेडचे सहाय्यक वनसंरक्षक एस. यु. जाधव यांच्यावर सोपवण्यात आली आहे. माहिती आयुक्त इंदलकर यांच्या या आक्रमक आणि न्यायप्रिय भूमिकेमुळे माहिती लपवून हुकूमशाही चालवणाऱ्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. दुसरीकडे, सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कासाठी प्रशासनाविरुद्ध यशस्वी लढा देणारे आरटीआय कार्यकर्ते आकाश सैदमवार यांच्यावर जनतेतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कन्नडमध्ये वृक्षारोपण

तभा वृत्तसेवा




**कन्नड :-** दि. ५ जून - जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कन्नड नगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागरिकांना वृक्ष लागवड व संगोपनासाठी प्रेरित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात लोकनियुक्त नगराध्यक्षा फारिन बेगम अब्दुल जावेद यांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाली. यावेळी माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक अब्दुल जावेद, मुख्याधिकारी रवींद्र लांडे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी विविध वृक्षांची लागवड केली.

यावेळी बोलताना मान्यवरांनी वाढते प्रदूषण, तापमानवाढ आणि बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. केवळ वृक्षारोपण करून थांबून चालणार नाही, तर लावलेल्या झाडांचे संगोपन करून त्यांना जगविण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे, असे आवाहन करण्यात आले. वृक्ष हे पर्यावरणाचा समतोल राखणारे महत्त्वाचे घटक असून भविष्यातील पिढ्यांसाठी हरित वारसा जपणे ही काळाची गरज असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

या कार्यक्रमास माजी उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील, नगरसेवक आयाज शहा, भैय्या मेंबर, संदीप घोंघटे, अजीज सेठ, शहेबाज बागवान, शिवकुमार जैस्वाल, असलम पटेल, अब्दुल रऊफ, आजीम शहा, तारीख सेठ, राजु शेख, गोकुळ राठोड, विजय शिरसाट, प्रदीप बोडखे, आबेद खान, पवन ठाकूर, इम्रान शेख, सोमनाथ दाभाडे, आदित्य गर्जे,, हाजी खान, असद पवार, अरुण राठोड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच उपमुख्याधिकारी राठोड, भाग्यश्री बेडगे, वैशाली दाभाडे,प्राजक्ता शेजुल, दौंड, प्रतीक्षा दिवाणे यांच्यासह नगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनाची शपथ घेत 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला.

# फारोळा ग्रामपंचायत येथे प्रशासक म्हणून सलीम पठाण

तभा वृत्तसेवा



**बिडकीन दि ५:** जून मुदत संपलेल्या ग्रामपंचायत निवडणूक होत नाही तोपर्यंत प्रशासक म्हणून सरपंच पदावर असल्याने सरपंच यांची शासनाच्या वतीने प्रशासक म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश देण्यात आले आहे पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे शासकीय आदेशानुसार प्रशासक पदाचा कारभार स्विकरला या वेळी प्रशासक सलीम महमंद पठाण यांचे ग्रामपंचायत अधिकारी ए.एस. तुपे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.यावेळी .मीनाक्षी धुमाळ,अनिता पठारे,रेखा इंदापुरे,कोमल निकम, विष्णू धरपळे,गोरख शिंदे,रविंद्र गोरे,दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव, संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ अदि गावकरी उपस्थित होते

# देवस्थान जमिनींबाबतच्या प्रस्तावित कायद्याला विहिंपचा विरोध

## मंदिरांच्या हक्कांवर गदा आणणारा निर्णय; व्यापक चर्चेनंतरच कायदा करावा – प्रा. संजय गायकवाड

तभा वृत्तसेवा



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय करणारा असून हिंदू धार्मिक संस्थांच्या स्वायत्ततेवर आघात करणारा आहे, असा आरोप विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांताध्यक्ष प्रा. संजय गायकवाड यांनी केला. देवस्थानांच्या जमिनींचे खरे मालक भगवान असून विश्वस्त व पुजारी हे केवळ व्यवस्थापक आहेत. त्यामुळे मंदिरांच्या जमिनींवरील अतिक्रमणे हटवून त्या पुन्हा देवस्थानांच्या ताब्यात द्याव्यात, अशी मागणी त्यांनी पत्रकार परिषदेत केली.

यावेळी विहिंपचे धार्मिक पुंज क्षेत्र प्रमुख संजय मुद्राळे, मंदिर अर्चक-पुरोहित आयामचे देवगिरी प्रांत प्रमुख राजीव जहागीरदार, कायदेशीर सल्लागार ॲड. माधवराव भोकरीकर, ॲड. विलास सोनवणे आणि शिवाजीराव दहिवाल उपस्थित होते.

ॲड. माधवराव भोकरीकर यांनी सांगितले की, अनेक शतकांपासून विविध संस्थानिक आणि सत्ताधाऱ्यांनी मंदिरांच्या नित्य पूजाअर्चा, अन्नदान, उत्सव, धर्मशाळा, वेदपाठशाळा व गोशाळांच्या व्यवस्थेसाठी जमिनी इनाम स्वरूपात दिल्या आहेत. प्रस्तावित कायदा लागू झाल्यास देवस्थानांच्या उत्पन्नावर परिणाम होऊन अनेक धार्मिक व सामाजिक उपक्रम अडचणीत येऊ शकतात.

ॲड. विलास सोनवणे यांनी सांगितले की, अनेक देवस्थानांच्या जमिनींवर भूमाफिया व अतिक्रमणधारकांनी कब्जा केला आहे. अशा जमिनी अत्यल्प दरात हस्तांतरित करण्याचा कोणताही प्रयत्न स्वीकारार्ह नसून त्याला तीव्र विरोध केला जाईल.

राजीव जहागीरदार यांनी शासनाने देवस्थान जमिनींच्या प्रश्नावर तज्ज्ञ समिती नेमून सखोल अभ्यास करावा, अशी मागणी केली. तसेच राज्यभरातील देवस्थानांचे विश्वस्त, अर्चक, पुजारी आणि हिंदू संघटनांशी व्यापक चर्चा करून सर्वसंमतीनेच निर्णय घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

# आरएसपीएल समूहाचा ५० वर्षांचा सुवर्णप्रवास; 'मेड इन इंडिया'ची यशोगाथा जगभर पोहोचली

## रोजगारनिर्मिती आणि सामाजिक उपक्रमांत महत्त्वपूर्ण योगदान

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील आघाडीच्या एफएमसीजी (वेगाने विक्री होणाऱ्या ग्राहक वस्तू) उत्पादकांपैकी एक असलेल्या आरएसपीएल समूहाने आपल्या स्थापनेची ५० वर्षे पूर्ण करत उल्लेखनीय यशाचा टप्पा गाठला आहे. कानपूरमध्ये सुरू झालेला हा उद्योग आज देशासह आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही भक्कमपणे उभा राहिला आहे.

या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आरएसपीएल समूहाने आपल्या प्रवासावर आधारित एक विशेष लघुपट सादर केला आहे. अभिनेते व चित्रपट निर्माते रजत कपूर यांच्या निवेदनातून साकारलेला हा चित्रपट कंपनीची मूल्ये, वाटचाल आणि भविष्यातील दृष्टीकोन प्रभावीपणे मांडतो.

घडी डिटर्जंट या ब्रँडपासून सुरू झालेल्या आरएसपीएलच्या प्रवासाने आज मोठे रूप धारण केले आहे. मुरलीधर ज्ञानचंदानी आणि बिमल कुमार ज्ञानचंदानी यांनी कानपूरमध्ये सुरू केलेला हा ब्रँड सध्या देशातील सुमारे ३२ टक्के घरांपर्यंत पोहोचला आहे. कंपनीची उत्पादने नेपाळ, बांगलादेश आणि इथिओपियासह अनेक देशांमध्ये निर्यात केली जात आहेत.

देशभरातील २४ हून अधिक उत्पादन प्रकल्पांद्वारे 'भारतामध्ये निर्मित, भारतासाठी' या संकल्पनेला चालना देत आरएसपीएलने रोजगारनिर्मिती व औद्योगिक विकासातही मोठे योगदान दिले आहे. साबण व डिटर्जंट क्षेत्रातून सुरू झालेला समूह आज वैयक्तिक निगा, दुग्धजन्य पदार्थ, अन्न व पेय, रसायने, फॅशन, पायाभूत सुविधा, स्थावर मालमत्ता आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रांत कार्यरत आहे.

शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, जलसंधारण आणि आपत्ती निवारण यांसारख्या सामाजिक उपक्रमांतही कंपनी सक्रिय आहे. पुढील काळात संशोधन, नावीन्यपूर्ण उत्पादने आणि शाश्वत उत्पादन पद्धतींवर भर देत ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी आरएसपीएल कटिबद्ध असल्याचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक राहुल ज्ञानचंदानी यांनी सांगितले.

# 'तेरे इश्क में'ला प्रेक्षकांचे भरभरून प्रेम; 'लक्ष्मी निवास'च्या कलाकारांकडून चाहत्यांचे आभार

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, :** झी टीव्हीवरील 'लक्ष्मी निवास' मालिकेतील वीर आणि राधिका यांच्या प्रेमकथेवर आधारित 'तेरे इश्क में' या रोमँटिक गाण्याला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून ते दूरचित्रवाणीवरील लोकप्रिय रोमँटिक ट्रॅक्सपैकी एक ठरले आहे. सोशल मीडियावरील फॅन एडिट्स, रील्स आणि सकारात्मक प्रतिक्रियांमुळे या गाण्याची लोकप्रियता अधिक वाढली आहे.

या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना अभिनेता राघव तिवारी यांनी सांगितले की, वीर आणि राधिका यांच्या भावविश्वाचे सुंदर चित्रण असलेल्या या गाण्याला प्रेक्षकांनी दिलेले प्रेम अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी आहे. चाहत्यांकडून मिळणारी प्रत्येक प्रतिक्रिया कलाकारांना अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**महत्वाचे कागदपत्र हरवले**

मी नामे डॉ. संजय विनायक नाकाडे वय ५५ वर्षे, धंदा वैद्यकीय, रा. नारायणनगर, हिंगोली ता. जि. हिंगोली येथील रहिवासी असून लिहून देतो की, माझ्या मालकी व ताब्यातील असलेला प्लॉट हिंगोली नगर परिषद हद्दीतील मौजे नारायणनगर, हिंगोली ता. जि. हिंगोली येथील सर्व्हे नं. ९८/३ मधील प्लॉट क्र. ०१ एकुण क्षेत्रफळ २७८.७० चौ. फुट असून प्लॉट क्र. १५७ ची चतुःसिमा पुर्वेस : प्लॉट नं. २९, पश्चिमेस प्लॉट नं. १ चा भाग, उत्तरेस सर्व्हे नं. ९७ व दक्षिणेस : १२ मी. रुंदीचा लेआऊट रोड. येणे प्रमाणे वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉटचे मुळ खरेदीखत दस्त क्र. २५०३ दि. १७/०४/२००३ हे माझ्याकडून नारायणनगर, ते शिवाजीनगर, हिंगोली येथे जात असतांना दि. ०१/०५/२०२६ रोजी गहाळ झालेले आहे.

तरी कुणास कागदपत्रे सापडल्यास त्वरित संपर्क साधावा.

# महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेलची पुरेशी उपलब्धता

**छत्रपती संभाजीनगर :** आम्ही जनतेला आश्वस्त करू इच्छितो की पेट्रोल (एमएस), डिझेल (एचएसडी) आणि द्रवीकृत पेट्रोलियम वायू (एलपीजी) यांसह अत्यावश्यक पेट्रोलियम उत्पादनांची उपलब्धता इंडियनऑइलच्या सर्व पुरवठा माध्यमांद्वारे राज्यभर सामान्य आणि अखंडित आहे. मागील महिन्यात मागणीत वाढ झाली असली तरी एकूण पुरवठा स्थिती स्थिर आणि पुरेशी आहे. टर्मिनल्स आणि डेपो ते किरकोळ विक्री केंद्रांपर्यंत संपूर्ण इंधन पुरवठा साखळी कार्यक्षमतेने आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय कार्यरत आहे. इंधन साठ्यांवर सातत्याने लक्ष ठेवले जात असून, राज्यातील सर्व ठिकाणी पुनर्भरणाची कामे सुरळीतपणे सुरू आहेत.

# अदाणी फाउंडेशन आणि अनुष्का फाउंडेशनची भागीदारी

**महाराष्ट्र, 4 जून 2026:** अदाणी समूहाची सामाजिक विकास आणि कल्याण शाखा असलेल्या अदाणी फाउंडेशनने आणि सार्वजनिक आरोग्य भागीदारीच्या माध्यमातून क्लबफूट निर्मूलनासाठी कार्यरत असलेल्या विशेष स्वयंसेवी संस्था अनुष्का फाउंडेशनने एकत्र येत पाच राज्यांतील क्लबफूटग्रस्त 10,000 हून अधिक मुलांना मदत करण्यासाठी नवी भागीदारी जाहीर केली आहे. जागतिक क्लबफूट दिनानिमित्त घोषित करण्यात आलेला हा तीन वर्षांचा उपक्रम मध्य प्रदेश, हरियाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि हिमाचल प्रदेशातील 61 जिल्ह्यांमध्ये उपचारांची उपलब्धता वाढवणे, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मजबूत करणे आणि दीर्घकालीन काळजी सुधारणे यावर भर देणार आहे.

**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate :** **SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH**
At Post Gokul, Near Sawat Mandir, Phulambri,
Dist. Chh. Sambhajinagar (Aurangabad) 431 111

**Name of political party :** **Bharatiya Janata Party**
(Independent candidates should write "independent" here)

**Name of Election :** **Maharashtra Legislative Council from Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**

**Name of Constituency :** **Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**

I **SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil | Nil |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

**Place : Mumbai**
**Date : 02.06.2026**

Name & Signature of Candidate
**(SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH)**

**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate :** **AMARNATH ANANTRAO RAJURKAR**
'Devashish', H.No.1/2/113, Shivajinagar, Dist. Nanded 431 602

**Name of political party :** **Bharatiya Janata Party**
(Independent candidates should write "independent" here)

**Name of Election :** **Maharashtra Legislative Council from Nanded Local Authorities Constituency**

**Name of Constituency :** **Nanded Local Authorities Constituency**

I **AMARNATH ANANTRAO RAJURKAR,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil | Nil |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

**Place : Mumbai**
**Date : 02.06.2026**

Name & Signature of Candidate
**(AMARNATH ANANTRAO RAJURKAR)**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgement dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party :** **Bharatiya Janata Party**
***Name of Election :** **Maharashtra Legislative Council from Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**
**Name of State/UT :** **Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency | SUHAS TRIMBAKRAO SHIRSATH | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : Aurangabad-cum-Jalna Local Authorities Constituency**

**Place : Mumbai**
**Date : 04.06.2026**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation.......
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgement dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party :** **Bharatiya Janata Party**
***Name of Election :** **Maharashtra Legislative Council from Nanded Local Authorities Constituency**
**Name of State/UT :** **Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | Nanded Local Authorities Constituency | AMARNATH ANANTRAO RAJURKAR | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : Nanded Local Authorities Constituency**

**Place : Mumbai**
**Date : 04.06.2026**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation.......
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**